तुम्हाला तुमच्या बिजनेस व इंडस्ट्रीमध्ये खुप समस्या येत आहेत का? तुमची इंडस्ट्री व बिजनेस प्रॉफीटमध्ये नाही का?
तर आता काळजी करू नका...
तुमच्या इंडस्ट्री, बिजनेसमध्ये कोणत्याही प्रकारची तोडफोड न करता सायंटिफिक पद्धतीने एनर्जी बॅलन्स करून येत असलेल्या समस्येतून मुक्त व्हा आणि ते पण खात्रीशीर.
या पॉजिटिव्ह ट्रान्सफॉर्मेशनचा अनुभव घेण्यासाठी आमच्याशी संपर्क साधा
भूमाता ॲडव्हान्स वास्तू । रिसर्च सेंटर
सोनानगर चौक, कुष्टधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर
भगिरथ भारद्वाज मो. 9529818737 / 0241-3599263
इंडस्ट्री, बिजनेस व कमर्शियल प्रोजेक्ट वास्तू एक्सपर्ट वेळ स.११ ते रा.८ कृपया अपॉइंटमेंट घेणे आवश्यक



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला
साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०९.०७.२०२५ | अंक नं. ८६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर + 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# नगरमध्ये ग्रामविकास विभागाचा बनावट शासन निर्णय दाखवून ५.५६ कोटींची ३३ विकासकामे करणाऱ्या ठेकेदारावर गुन्हा दाखल

## बांधकाम विभागाच्या अभियंत्याने दिली फिर्याद; नेवासा व श्रीगोंद्यातही झालीत कामे

नगर - राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाचा बनावट शासन निर्णय दाखवून विविध विकास कामे करण्यात आल्याचा प्रश्न विधानसभेत उपस्थित झाल्यानंतर अशा प्रकारे नगर तालुक्यात ५ कोटी ५६ लाखांची ३३ विकास कामे करणाऱ्या एका ठेकेदाराविरुद्ध शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी नगरच्या कोतवाली पोलिस ठाण्यात ९ जुलै रोजी पहाटे १.४८ च्या सुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्षय चिर्के (रा. देऊळगाव सिद्धी, ता.नगर) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. अशा प्रकारची कामे नेवासा व श्रीगोंदा तालुक्यातही झाली असल्याची माहिती पुढे आली आहे.

याबाबत सार्वजनिक बांधकाम उप विभाग अहिल्यानगर कनिष्ठ अभियंता सचिन सुभाष चव्हाण (वय ४१, रा. सुखसागर कॉलनी, वाणीनगर, पाईप लाईन रोड) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे मागील ७ वर्षापासुन अशोका हॉटेल समोरील बांधकाम विभागाच्या कार्यालयात नेमणुकीस आहेत. नगर तालुक्यातील, नगर-पारनेर, व नगर-श्रीगोदा तसेच अहिल्यानगर शहर मतदार संघातील कामांचे अंदाजपत्रके बनवणे, नियमानुसार काम करून घेणे आणि झालेल्या कामाचे देयक वरीष्ठ कार्यालयात सादर करण्याचे काम पाहतात.

४ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी ३ चे सुमारास कार्यालयीन कामकाज करत असताना तेथे अक्षय चिर्के (रा. देऊळगाव सिंध्दी ता. नगर) हा इसम आला व त्याने त्याचेकडील असलेला महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, मुंबई यांचा ३ ऑक्टोबर २०२४ चा शासन निर्णय आदेशाची झेरॉक्स प्रत दिली. त्यानुसार तालुक्यातील वाकोडी, बुऱ्हाणनगर, देऊळगाव सिंध्दी, कामरगाव, चास, बाबुर्डी बेंद येथिल कामासाठी सदर कामाच्या जागेची सोबत पाहणी करून अंदाजपत्रके तयार करण्याची मागणी करण्यात आली. त्यानुसार अभियंता चव्हाण यांनी सदर ठिकाणाची पूर्ण पाहणी अक्षय चिर्के सोबत करून त्या कामांची अंदाजपत्रके तयार केली. त्यास विभागीय कार्यालयाकडून तांत्रिक मान्यता घेवुन निविदा प्रक्रिया तयार करुन घेवुन त्यापैकी काही कामांस १५ ऑक्टोबर २०२४ रोजी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अहिल्यानगर यांचे मार्फत कार्यारंभ आदेश निर्गमीत करण्यात आले.

### ऑनलाईन बिले सादर केल्यावर उघडकीस आला प्रकार

त्यानुसार अक्षय चिर्के याने तालुक्यातील या उपविभागाचे कार्यक्षेत्रातील एकुण कामांची संख्या ३३ असुन कामांची किंमत ५ कोटी ५६ लाख इतकी आहे. त्यापैकी १३ कामे सा. बा. विभागाच्या मानकानुसार व अंदाजपत्रका नुसार पुर्ण करुन घेण्यात आली. तसेच पुर्ण झालेल्या १३ कामापैकी ८ कामांची मोजमापे घेवुन देयके मोजमाप पुस्तकात नोंदवून विभागीय कार्यालयात ४० लाख रुपये *(पुढील मजकूर पान २ वर)*

# नगर-मनमाड महामार्ग चौपदरीकरणाच्या कामात दिरंगाई होत असल्याच्या निषेधार्थ खा.निलेश लंके यांचे ११ जुलैपासून उपोषण



नगर- नगर जिल्ह्यासाठी महत्वाच्या असलेल्या नगर मनमाड (एनएच १६०) या महामार्गाच्या रूंदकरणाच्या कामात प्रचंड दिरंगाई होत असल्याने जनतेमध्ये नाराजीचा सुर उमटत असून या नाराजीची दखल घेत खासदार निलेश लंके यांनी थेट राष्ट्रीय महामार्ग प्रधिकरण आणि प्रकल्प अंमलबजावणी विभागास इशारा देत ११ जुलैपासून बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे.

यासंदर्भातील निवेदनात खा लंके म्हणतात, सावळी विहीर किमी ८८.४०० ते अहमदनगर बायपास किमी १६३.४०० या ७५ किमी लांबीच्या चौपदरीकरणाच्या कामासाठी भारत कन्स्ट्रक्शन इंडिया प्रा. लि., देहरादून या कंपनीला ठेका देण्यात आला असून २१ मार्च २०२५ रोजी ठेका करार पार पडला होता. २९ एप्रिल रोजी सबंधित कंपनीस काम मंजुर होउनही आज अखेर कोणतेही काम प्रत्यक्ष सुरू झालेले नाही.

हा प्रकल्प भारतमाला योजनेअंतर्गत मंजूर असून या मार्गावर प्रचंड वाहतूक असते. जिल्हयातील शेतकरी, विद्याथ, वाहनचालक यांना दररोज अपुऱ्या आणि धोकादायक रस्त्यांवरून जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे मृत्यूच्या घटनाही घडत आहेत असे लंके यांनी नमूद केले आहे.

### प्रशासन आणि ठेकेदाराच्या निक्रियतेवर संताप

कामाची मंजुरी देण्यात आल्यानंतर दोन महिने उलटलेले असताना एकही यंत्र, मनुष्यबळ वा साहित्य तैनात न केले जाणे, हे प्रकल्पातील गंभीर निष्क्रियतेचे द्योतक असल्याची संतप्त भावना खासदार लंके यांनी यासंदर्भात दिलेल्या पत्रात व्यक्त केली आहे. या स्थितीवर प्रतिक्रया देताना खा. लंके म्हणाले, दिवसेंदिवस नागरिकांच्या तक्रारी वाढत असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे जनतेमध्ये असंतोष उफाळला आहे. काम तातडीने सुरू न झाल्यास हजारो नागरिकांसह मी स्वतः बेमुदत उपोषण करणार आहे.

खासदार लंके यांनी आपल्या पत्रात राष्ट्रीय महामार्ग प्रधिकरण आणि प्रकल्प अंमलबजावणी विभाग, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांच्यासह केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनाही माहीती दिली असून ११ जुलै रोजी सकाळी प्रकल्प संचालक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

### पत्रव्यवहार करूनही दुर्लक्ष

या प्रकल्पाच्या दिरंगाईबाबत खा. लंके यांनी ऑगस्ट २०२४ मध्येच केंद्रीय मंत्रयांना पत्र लिहून लक्ष वेधले होते. त्यावर मंत्रालयाचे सल्लागार बाळासाहेब ठेंग यांनी २९ ऑगस्ट रोजी तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले होते. यानंतर एक वर्षानंतरही प्रत्यक्ष काम सुरू न होणे हे गंभीर दुर्लक्ष असल्याचा आरोप खा. निलेश लंके यांनी केला. या कामास तात्काळ प्रत्यक्ष सुरुवात करावी, कामाची प्रगती व योजनाबध्द वेळापत्रक सादर करावे, स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने पर्यायी व्यवस्था करावी, दिरंगाईस जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशा मागण्या खा.लंके यांनी केल्या आहेत.

# धारदार हत्याराने वार करत तरुणाला लुटले

नगर - नगर एमआयडीसी परिसरातील नागापूर येथील डोंगरे कॉम्प्लेक्स जवळ प्राईम मेडिकल येथून पायी जाणाऱ्या तरुणाला दोघांनी अडवून शिवीगाळ करत धारदार हत्याराने वार करुन जखमी केले. तसेच त्याच्या खिशातील १ हजार ९०० रुपये बळजबरीने काढून घेऊन गेल्याची घटना ७ जुलै रोजी रात्री ११.३० वाजल्याच्या सुमारास घडली.

या बाबत आनंद बाबासाहेब खेडकर (वय ३३, रा. गजानन कॉलनी, नवनागापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे नवनागापूर येथील डोंगरे कॉम्प्लेक्स जवळील प्राईम मेडिकल जवळून रस्त्याने पाय घरी जात असताना, फिर्यादीस ओम बाबासाहेब आरु आणि अनिष बाळू पवार (दोघे रा. गजानन कॉलनी, नवनागापूर) यांनी अडवून विनाकारण शिवीगाळ करीत फिर्यादीच्या खिशातील १ हजार ९०० रुपये रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली. यावेळी फिर्यादीने त्यांना प्रतिकार केला असता अनिष पवार याने कमरेला खोसलेले धारदार हत्यार बाहेर काढून फिर्यादीच्या पोटावर आणि पायावर सपासप वार केले. या हल्ल्यात फिर्यादी हे गंभीर जखमी झाले असता दोघे तेथून पळून गेले.

या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आनंद खेडकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बी एन एस कलम ११९ (१) (२), ११५ (२), ३५१ (२), १२८ (२) नुसार जबरी चोरी व जीवघेणा हल्ला केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

SONI Since 1965 TILES AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

।। ॐ द्रां दत्तात्रेयाय नमः ॐ ।। ।। ॐ नमो भगवते श्री शंकर सद्गुरू राया ।।
।। मुझे वही जानता है, जो खुदको समझता है ।।



।। योगीराज सद्गुरू श्री शंकर बाबा महाराज ।।
गुरूपौर्णिमा उत्सव
सद्गुरू कृपांकित भाविक-भक्तांनो सालाबादप्रमाणे याही वर्षी गुरूवार दि.१०/०७/२०२५ रोजी गुरूपौर्णिमा उत्सव सोहळा साजरा होणार आहे.
सद्गुरूंच्या दर्शन सोहळ्याचा लाभ घ्यावा ही मंगल भक्त सेवा मंडळाच्या वतीने नम्र विनंती.
- कार्यक्रमाची रूपरेषा -
सकाळी ९.०० ते १०.३० - श्रीं चा महाअभिषेक
दुपारी १.०० ते २.०० - श्रीं ची महाआरती, पालखी सोहळा तद्नंतर दर्शन सोहळा व महाप्रसाद
सायं ७.०० ते ९.०० - श्री ह.भ.प.नवनाथजी महाराज म्हस्के बाभळेश्वर यांचे गुरूचरित्रावर आधारित जाहिर हरि किर्तन होईल.



।। भागवताचार्य ।। श्री ह.भ.प. नवनाथजी महाराज म्हस्के
- आपले विनित -
श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (श्री राजाभाऊ कोठारी) - अध्यक्ष - मंगल भक्त सेवा मंडळ (ट्रस्ट)
मंगल दत्त क्षेत्र, एफ-७०, एम.आय.डी.सी., अहिल्यानगर
टिप : कृपया पुष्पगुच्छ आणु नये त्यापेक्षा अन्नदान व वैद्यकीय सेवेत सहभाग नोंदवावा !



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जिल्हाधिकारी कार्यालयावर कर्मचाऱ्यांचा मोर्चा

## कर्मचारी विरोधी धोरणाचा निषेध; बेमुदत संपाचा इशारा; पुन्हा सत्तेवर येताना युती सरकारने आश्वासने अद्यापि पूर्ण केला नसल्याचा आरोप


कर्मचारी विरोधी धोरणाचा निषेध करत जिल्हाधिकारी कार्यालयावर कर्मचाऱ्यांचा धडक मोर्चा काढण्यात आला.

नगर – केंद्र सरकारच्या खासगीकरणाच्या आणि कामगार कायद्यांच्या विरोधात ९ जुलै रोजी पुकारण्यात आलेल्या संपाला पाठिंबा देऊन कामगार संघटना महासंघ, किसान सभा समन्वय समिती, सरकारी निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समिती अहिल्यानगरच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. मागील सत्ता काळात युती सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता पुन्हा सत्ता आल्यानंतर अद्यापि केलेली नसल्याचे लक्ष वेधत केंद्र व राज्य सरकारच्या कर्मचारी विरोधी धोरणाचा निषेध नोंदविण्यात आला. तर हा मोर्चा भविष्यातील बेमुदत संपाचा इशारा असल्याचे जाहीर करण्यात आले.

नगर-संभाजीनगर महामार्गावरील महापालिका येथून बुधवारी सकाळी मोर्चाचे प्रारंभ करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकला असता निदर्शने करून घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी घोषणांनी परिसर दणाणून निघाला. या आंदोलनात समन्वय समितीचे जिल्हा निमंत्रक रावसाहेब निमसे, राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, विलास पेद्राम, भाऊसाहेब डमाळे, आप्पासाहेब शिंदे, महेंद्र हिंगे, ड. सुधीर टोकेकर, अविनाश घुले, प्रा. सुनील पंडित, अर्शद शेख, महेबूब सय्यद, अशोक सब्बन, भाऊ शिंदे, बन्सी सातपुते, विजय काकडे ,पुरुषोत्तम आडेप, अशोक मासाळ, संदिपान कासार, भागवत नवगण, देविदास पाडेकर, अरविंद वाव्हळ, श्रीमती व्हि.डी. नेटके, डी.ए. गजभार, श्रीमती एम.एस. बाचकर, युवराज पाटील, अशोक नरसाळे, सयाजीराव वाव्हळ, सिद्धेश्वर कांबळे, सुधीर भद्रे, भारती न्यालपेल्ली, नंदाताई बांगर आदींसह सरकारी-निमसरकारी कर्मचारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

राज्य सरकारी कर्मचारी, शिक्षक यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी शासनाचे दुर्लक्ष होत आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. महाराष्ट्रातील जनतेने मोठ्या विश्वासाने युतीच्या सरकारला पुन्हा प्रचंड बहुमताने निवडून दिले. सहा महिन्यांचा कालावधी उलटून गेला, या कालावधीत मागील शासनाने आश्वासित केलेल्या मागण्या संदर्भात ठोस निर्णय घेऊन सकारात्मक कारवाई होऊ शकलेली नाही. तसेच या संदर्भात कोणतीही दखल घेण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असताना शासनाने जुनी पेन्शन, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग आणि इतर आर्थिक व सेवा विषयक प्रश्न बाबतजी आश्वासने दिली त्याबाबत कोणतीही सकारात्मक कार्यवाही झालेली नाही. देशातील ११ कामगार संघटना केंद्र व राज्य सरकारच्या कर्मचारी विरोधी धोरणाला विरोध करण्यासाठी देशव्यापी संप करीत असून, या संपात सर्व सहभागी होऊन सरकारचे लक्ष वेधून पुन्हा बेमुदत संपाचा इशारा यावेळी देण्यात आला. याप्रसंगी प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणात कामगार विरोधी धोरण व सरकारच्या भूमिकेचा निषेध व्यक्त केला. सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्याबाबतची विस्तृत अधिसूचना तात्काळ जारी करण्यात यावी, १० वर्षे सतत काम करीत असलेल्या सर्व कंत्राटी, रोजंदारी, अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित कराव्या, केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी २०२५ पासून दोन टक्के महागाई भत्ता वाढ मंजूर करावा, १०-२०-३० वर्षाच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावा, आठव्या वेतन आयोगाची सत्वर स्थापना करण्याबाबत केंद्र शासनाकडे आग्रह धरावा अन्यथा प्रत्येक पाच वर्षाच्या कालावधीनंतर वेतन मान पुनर्रचनेसाठी राज्याचा स्वतंत्र आयोग नेमावा, सरकारी कर्मचारी कर्तव्य बजावत असताना होणाऱ्या भ्याड हिंसक हल्ल्यांविरोधात कठोर कारवाई व्हावी, यासाठी आयपीसी कलम ३५३ मध्ये दुरुस्ती करून कलम ३५३ अजामीनपात्र करण्यात यावे, सर्व संवर्गातील रिक्त पदे भरण्याचा संदर्भात कार्यवाही व्हावी, चार कामगार कायदे संहिता रद्द करावे व शिक्षकांचे जीवन उध्वस्त करणारा १५ मार्च २०२४ संच मान्यतेचा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागण्यांचा समावेश असलेली २० मागण्यांची सनद जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठविण्यात आली आहे.

# कामगारविरोधी कायद्याविरोधात पुकारलेल्या संपाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महापालिका कामगार युनियनच्यावतीने 'निदर्शने'


कामगार विरोधी कायद्या विरोधात देशव्यापी पुकारलेल्या संपाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनच्या वतीने निदर्शने करण्यात आली. (छाया – लहू दळवी)

नगर – देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर देशातील १० केंद्रीय कामगार संघटना व क्षेत्रवार महासंघ यांच्या अखिल भारतीय संयुक्त मंचाच्या वतीने सार्वत्रिक संप पुकारलेला आहे. संपामध्ये केंद्रीय कामगार कर्मचारी कृती समितीच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघाची संलग्न असलेली अहिल्यानगर महानगरपालिका कामगार दिनाच्या कामगार कर्मचाऱ्यांनी संपामध्ये सहभागी होऊन महापालिका प्रशासकीय कार्यालयाच्या आवारात निदर्शने करून उपायुक्त विजयकुमार मुंडे यांना निवेदन देण्यात आली. यावेळी सचिव कॉम्रेड आनंद वायकर, अध्यक्ष जितेंद्र सारसर, सरचिटणीस कॉ.आनंदराव वायकर, कार्याध्यक्ष नंदकुमार नेमाने, राहुल साबळे, विठ्ठल उमाप, बलराज गायकवाड, ऋषिकेश भालेराव, संदीप चव्हाण, बाबासाहेब राशिनकर, उपाध्यक्ष अंतवन क्षेत्रे, प्रकाश साठे, भास्कर आकुबत्तीन, सागर साळुंके, सतीश ताठे, कविता खिल्लारी, सहचिटनीस सोनू चौधरी, ओंकार कराळे, ओंकार ढोणे, योगेश पंडित, ओंकार आमले, कार्यकारणी सदस्य सनी सप्रे, अक्षय मतकर, राहुल भालेराव, प्रसाद झिंजुर्डे, आनंदा झारखंडे, कृष्णा लालबेगी, अभिजीत गोहेर आदी उपस्थित होते

केंद्र सरकारने कामगार कायद्याचे बिल पास केले असून पूर्वीचे कामगारांबाबत असणारे सर्व कायदे चार संहितामध्ये आणले आहे कामगारांच्या बाजूने जेवढे कायदे होते तेवढे काढून उद्योजकांच्या फायद्यासाठीचे कायदे तयार केले आहे, केंद्र सरकारने राज्य सरकारला निर्देश देऊन रुल तयार करण्याचे सांगितले होते त्यानुसार तयार देखील झाले आहे, आता फक्त अंमलबजावणी करायची आहे कामगार संघटनाना संप करायचा अधिकार राहणार नाही, तसे कोर्टात जाण्यासाठीची तरतूद देखील राहणार नाही न्यायालयाचा अधिकार खाली सनदी अधिकाऱ्याला दिलेला आहे त्यामुळे कामगारांना यापुढील काळात न्याय मिळणार नाही, कामगार चळवळ व लढा मोडीत काढण्यासाठी केंद्र व राज्य सरकार प्रयत्न करीत आहे मात्र देशभरातील कामगार संघटना या कायद्या विरोधात लढून हा कायदा मागे घेण्यासाठी केंद्र व राज्य सरकारला भाग पाडू असे प्रतिपादन युनियनचे सचिव कॉम्रेड आनंद वायकर यांनी केले.

यावेळी निवेदनात पुढे म्हणाले की, कामगार हक्क, लोकशाही संरक्षण आणि सामाजिक न्यायासाठी सध्या देशभरात संतप्त लाट उसळताना दिसत आहे. केंद्र व राज्य सरकारकडून राबवण्यात येणाऱ्या कामगारविरोधी धोरणांमुळे श्रमिकांच्या जगण्याचा मूलभूत अधिकारच धोक्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर विविध संघटनांकडून ११ प्रमुख मागण्यांसह सरकारला थेट इशारा देण्यात आला आहे. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र जनआंदोलन उभारले जाईल, असा अहिल्यानगर महानगरपालिका युनियनच्या वतीने देण्यात आला.

# प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षरधन
"मुसाफिर"-९८२२०२०६९१



## तुम्ही कोण तर तुम्ही स्वत:ला समजता तसे...

माणसाच्या मनात चांगलं-वाइटं खरं-खोटं अशी विचार शृंखला निरंतर गुंफलेली असते. बऱ्याचदा माणूस स्वत:ला विचारतो मी कोण? मी कसा? इ.इ.

अर्थातच प्रत्येकाला वाटते मी चांगला आहे किमान तसा असणार! एक चांगला माणूस केवळ तसा नसतो जो वाईट करत नाही. या उलट जो चांगले करतो तसा तो असतो.

म्हणूनच माणसानं नेहमीच स्वत:ला शांत, समाधानी, आनंदी, दयाळू, परोपकारी समजावे. तसा राहण्या, वागण्याचा प्रयत्न करावा. कारण माणूस तसाच बनतो जसा तो स्वत:ला मानतो समजतो.

आयुष्य साधं सरळच असेल असे नाही. ते खूप गंभीरही आहे मात्र ते हास्यानंदात जगता यावे. साधेपणात खरं सौंदर्य दडलं आहे विचार व मन:स्थिती स्थिर असावेत. आपण घाबरत राहिल्यास आयुष्यात कधी काही करू शकणार नाही.

शिक्षण, ज्ञान मिळवण्याचा अर्थ असा नव्हे की आपण इतरांपेक्षा उत्कृष्ट आहोत, मोठे आहोत तर आपण अधिक जबाबदार आहोत अशी विचारसरणी असावी.

प्रेम म्हणजे काय? भारतीय संस्कृतीत प्रेमात मिळवावे त्यापेक्षा त्यागाची भावना मोठी समजतात. त्याग करणाराच प्रेमात मोठा बनतो. आजकाल स्वार्थ, अहंकार, पझेसिव्हनेस यामुळे माणूस आंधळा व बेधुंद बनलाय.

म्हणूनच विवेक, प्रेमादरख, सहअनुभूती, परोपकार या भावना अधिकाधिक वाढवाव्या लागलीय. हृदयाच्या अंतरंगात सहानुभूती, अनेकांतवाद नसेल तर खऱ्या आनंद, समाधानाचा प्रत्यय येणे अवघडच.

तात्पर्य काय तर कधी कधी स्वत:शीच संवाद साधत मी कोण? याचा विचार करायला हवा.

यातूनच कळेल मी स्वत: कोण? मी काय करतोय? मला कुठे जायचेय? बघा, कदाचित यातूनच जीवनाचं गमक कळेल...

## ॲड. मीनाक्षी क्षीरसागर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – आठरे पाटील शाळेजवळील वरद गणेश कॉलनीतील रहिवासी सौ. (ॲड.) मीनाक्षी क्षीरसागर (वय ५५) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती व १ मुलगी असा परिवार आहे.

सौ. मीनाक्षी क्षीरसागर यांनी सुमारे २५ ते ३० वर्षे ॲडव्होकेट म्हणून काम पाहिले. आपल्या आईच्या नावाने स्व. सविता रमेश देशपांडे चॅरिटेबल ट्रस्ट त्यांनी स्थापन केला होता. या ट्रस्टच्या त्या संस्थापक अध्यक्षा होत्या. परिस्थितीवर मात करून विश्व निर्माण केलेल्या महिलांना दरवर्षी १० मार्च रोजी रणरागिणी पुरस्कार या ट्रस्टमार्फत देण्यात येत होता. दरवर्षी त्या रक्तदान शिबीरे घेत होत्या. या माध्यमातून त्यांनी जवळपास एक हजार रक्तपिशव्या जनकल्याण रक्तपेढीस सुपूर्द केल्या आहेत. या ट्रस्टमार्फत अनेक गरजूंना त्या वेळोवेळी विविध स्वरूपाची मदत करीत होत्या. गजानन महाराज सत्संग मंडळाच्या अध्यक्षा म्हणूनही त्या काम पाहत होत्या.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या त्या सदस्य होत्या. आपल्या आईच्या जीवनावर आधारित 'आई' नावाचे पुस्तकही त्यांनी प्रकाशित केले होते. एल ॲण्ड टी कंपनीतील सेवानिवृत्त अधिकारी संजय क्षीरसागर यांच्या त्या पत्नी होत.

## लक्ष्मीबाई सदाफुले यांचे अल्प आजाराने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी लक्ष्मीबाई जगन्नाथ सदाफुले (वय ७०) यांचे ९ जुलै रोजी पहाटे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यवर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भाऊ, महेश सदाफुले यांच्या त्या मातोश्री होत.

## अशोक दानवे यांचे अपघाती निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी अशोक संजय दानवे (वय १९) यांचे ८ जुलै रोजी अपघाती निधन झाले. त्यांच्यावर सांडवे फाटा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ भाऊ, आई-वडील असा परिवार आहे. संजय दानवे यांचे ते मोठे चिरंजीव होत.

## अनिल देऊळगावकर यांचे अल्प आजाराने निधन



शेवगव – शेवगाव येथील वृत्तपत्र विक्रेते व पत्रकार अनिल माधवराव देऊळगावकर (वय ५७) यांचे ५ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर शेवगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ भाऊ, भावजय, बहिण, पत्नी, २ मुले, १ मुलगी असा परिवार आहे. गेल्या ४० वर्षांपासून ते वृत्तपत्र व्यवसाय व पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत होते. सौरभ व अभिलाष देऊळगावकर यांचे ते वडील होत.

## यशोदाबाई चितळे यांचे वृध्दापकाळाने निधन




नगर– गुलमोहररोड, आनंदनगर येथील रहिवाशी यशोदाबाई सोपानराव चितळे (वय ७७) यांचे ९ जुलै रोजी पहाटे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

ॲड.सुहास चितळे व अजित चितळे यांच्या मातोश्री होत तसेच प्रतापकाका ढाकणे यांच्या त्या सासूबाई होत्या.

## प्रभाकर साळुंके यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – अहिल्यानगर शहरातील रामचंद्र खुंट येथील रहिवासी व बँक ऑफ बडोदाचे वरिष्ठ लिपिक सेवानिवृत्त प्रभाकर माणिकराव साळुंके (८० वय) यांचे ६ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. नगर येथील अमरधाममध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व.प्रभाकर हे पानसरे गल्ली येथील नगरकर नाभिक पंच-वाडाचे चीफ ट्रस्टी होते. नाभिक समाजातील प्रश्नांकरता ते संघटनेच्या माध्यमातून हिरोरिने भाग घेत असत. त्यांच्या मागे पत्नी, ३ मुली, जावई, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. नगर येथील वेतन पथक अधीक्षक हेमंत साळुंके यांचे ते वडील होत.

## शकुंतला नारंग यांचे अल्प आजाराने निधन



नगर– मिस्किनमळा येथील रहिवाशी श्रीमती शकुंतला किशनचंद नारंग (वय ७३) यांचे ९ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे एक मुलगी, दोन नातवंडे असा परिवार आहे. भारती छाब्रिया यांच्या त्या मातोश्री होत. एमजी रोड व माणिकचौक येथील व्हीआयपी सर्व्हिस सेंटरचे त्या संचालिका होत्या.

## नामदेव हराळ यांचे वृध्दापकाळाने निधन



नगर– गुंडेगाव येथील रहिवाशी नामदेव आनंदा हराळ (वय ९७) यांचे ९ जुलै रोजी राहत्या घरी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर गुंडेगाव येथील हराळमळा, अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे चार मुले, एक मुलगी, सुना,जावई, नातवंडे असा परिवार आहे. वारकरी मंडळाचे अध्यक्ष हभप शिवसेन महाराज हराळ, गुंडेगाव सोसायटीचे माजी चेअरमन, धान्य वितरक रावसाहेब हराळ, बाबासाहेब हराळ, तुळशीराम हराळ यांचे ते वडील होत.


केंद्र सरकारच्या खासगीकरणाच्या आणि कामगार कायद्यांच्या विरोधात देशातील कामगार संघटनांनी ९ जुलै रोजी भारत बंद पाळला. यामध्ये बीएसएनएल कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी बीएसएनएल एम्प्लॉईज युनियन व एनएफटीई एकत्रितपणे या संपात सहभागी झाले होते.

# संपात सहभागी होऊन बीएसएनएल कर्मचाऱ्यांची निदर्शने

## केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणांचा निषेध; सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण थांबवावे व जुने ४४ कायदे पुन्हा लागू करण्याची मागणी

नगर – केंद्र सरकारच्या खासगीकरणाच्या आणि कामगार कायद्यांच्या विरोधात देशातील कामगार संघटनांनी ९ जुलै रोजी भारत बंद पाळला. यामध्ये बीएसएनएल कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी बीएसएनएल एम्प्लॉईज युनियन व एनएफटीई एकत्रितपणे या संपात सहभागी झाले होते. अहिल्यानगर शहरातील बीएसएनएलच्या कार्यालया समोर निदर्शने करुन कर्मचाऱ्यांनी केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणांचा निषेध नोंदवला. या आंदोलनात कॉ. आप्पासाहेब गागरे, बीएसएनएल युनियनचे सचिव कॉ. विजय शीपणकर, एनएफटीईचे अशोक हिंगे, शंकर चेडे, संतोष शिंदे, चंद्रकला नवले, शिला झेंडे, डी.एम. चक्रनारायण, सुनील ससाणे, संतोष भोसले, प्रशांत अष्टेकर, गौरी बडवे, संगीता सोनवणे, आयशा शेख, यशोदा शिंदे, सागर सोनवणे, अशोक पाखरे, अशोक हजारे, लालाजी शेख, राजू कोकरे, शिवाजी मोढवे, दिलीप कोल्हे, लूथर गायकवाड, रमेश शिंदे, बाळासाहेब गाडळकर आदी सहभागी झाले होते.

यावेळी कॉ. आप्पासाहेब गागरे, कॉ. विजय शीपणकर व एनएफटीईचे अशोक हिंगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करुन हा संप निर्णायक संघर्षासाठी सरकारला इशारा असून, तातडीने प्रश्न न सुटल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला. देशभरातील लाखो कामगार, कर्मचारी व सार्वजनिक क्षेत्रातील सहकारी रस्त्यावर उतरले आहेत. ही केवळ एक संप नाही तर सरकारच्या कामगार विरोधी सार्वजनिक क्षेत्र विरोधी आणि जनविरोधी धोरणाविरुद्धचा आक्रोश असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

बीएसएनएल भारताच्या जनतेच्या सेवेसाठी समर्पित एक स्वदेशी संस्था आहे. ही संस्था गंभीर संकटातून जात असून, याकडे सरकारचे दुर्लक्ष करुन खाजगीकरणाचे धोरण स्विकारुन कॉर्पोरेट घराण्यांना फायदा पोहोचवण्याचे काम केले जात असल्याने बीएसएनएल सारख्या संस्थेच्या मुळावरच घाव टाकला जात असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. सरकार श्रम कायदे रद्द करून भांडवलदारांच्या बाजूने नवीन कायदे लादत आहेत. त्यामुळे केवळ संघटित कामगार नाही, तर असंघटित क्षेत्रातील कोट्यावधी कामगार देशोधडीस लागणार आहे. बीएसएनएल कर्मचारी बीएसएनएल एम्प्लॉईज युनियन व एनएफटीई यांच्या संघर्षात खांद्याला खांदा लावून उभे असल्याची भूमिका मांडण्यात आली.

बीएसएनएलसह सर्व सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण थांबवावे, सर्व कर्मचाऱ्यांना वेतन सुधारणाचा प्रश्न त्वरित निकाली काढून वेळेवर वेतन व भत्ते द्यावे, बीएसएनएलला कमकुवत न करता सुविधा देण्यासाठी आधार द्यावा, चांगल्या दर्जाची फोरजी, फाईव्हजी सेवा त्वरीत सुरु करावी, तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी नवीन पदोन्नती धोरण लागू करावे, मनुष्यबळाचे पूर्ण रचनेचा आढावा घेऊन तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठीच्या पुरेशा जागा भराव्या, कंत्राटी कामगारांना नियमानुसार आणि वेळेवर त्यांच्या पगार द्यावा, सर्वांना खात्यामध्ये कायम करावे, ट्रेड युनियनच्या जुने ४४ कायदे पुन्हा लागू करावे आणि ट्रेड युनियन यांच्या हक्कांवर हल्ले थांबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

## चंद्रकलाबाई रासने यांचे हृदयविकाराने निधन



नगर– सिव्हिल हडको येथील रहिवाशी श्रीमती चंद्रकला प्रकाश रासने (वय ६०) यांचे ८ जुलैला हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात १ मुलगा, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रमेश (भाऊ) रासने यांच्या त्या मातोश्री होत.

# नगरमध्ये ग्रामविकास विभागाचा बनावट शासन निर्णय दाखवून ५.५६ कोटींची ३३ विकासकामे करणाऱ्या ठेकेदारावर गुन्हा दाखल

(पान १ वरुन)

मंजुरीसाठी सादर करण्यात आली. तदनंतर विभागीय कार्यालयाने सदर देयकाची छाननी करून निधी मागणी साठी देयके नियमा प्रमाणे एलपीआरएस प्रणालीवरुन ऑनलाईन पध्दतीने ग्रामविकास विभागाकडे सादर करण्यात आली. तथापी महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचा ३ ऑक्टोबर २०२४ चा शासन निर्णय हा बनावट असल्याचे व संबधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्याबाबतचे कक्ष अधिकारी ग्राम विकास विभाग मुंबई यांचे पत्र ४ एप्रिल २०२५ रोजी प्राप्त झाले व सदर पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयास कळविण्यात आले.

## १३ कामे पूर्ण उर्वरित २० कामांना स्थगिती

त्याअनुषंगाने कार्यकारी अभियंता यांनी उर्वरित २० कामास स्थगिती दिली. तसेच सदर एकुण ३३ कामावर नगरच्या बांधकाम विभाग कार्यालया कडुन कोणत्याही प्रकारचे देयक अदा करण्यात आलेले नाही. तसेच कार्यकारी अभियंता यांना शासनाच्या आदेशा नुसार सदरहू बनावट शासन निर्णय सादर करणाऱ्या संबधिता विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे. त्यांच्या आदेशानुसार अभियंता चव्हाण यांनी ८ जुलै रोजी रात्री उशिरा कोतवाली पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून अक्षय चिर्के व इतरांच्या विरुद्ध शासनची फसवणुक केल्या प्रकरणी बी.एन.एस.२०२३ चे कलम ३१८ (४), ३३६ (२),३३८, ३३६ (३), ३४० (२), ३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### तर चॉकलेट खाऊ नये

चॉकलेटचे नाव ऐकताच मन प्रसन्न होते. मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत, सर्व वयोगटातील लोकांना ते चाखायला आवडते. डार्क चॉकलेट, मिल्क चॉकलेट, व्हाईट चॉकलेट, त्याचे अनेक फ्लेवर्स आणि प्रकार आज बाजारात उपलब्ध आहेत. संशोधनात असेही म्हटले आहे की डार्क चॉकलेटमध्ये अँटीऑक्सिडंट्स आढळतात जे हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले असतात, मूड सुधारतात आणि रक्ताभिसरण देखील सुधारतात. पण प्रत्येक चविष्ट गोष्ट नेहमीच आरोग्यासाठी फायदेशीर नसते, विशेषतः जेव्हा चॉकलेटचा विचार केला जातो. साखर, चरबी आणि कॅलरीजचे प्रमाण खूप जास्त असते, विशेषतः दूध आणि फ्लेवर्ड चॉकलेट. वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांनी चॉकलेट खाणे टाळावे. ते केवळ वजन कमी करण्याची प्रक्रिया मंदावत नाही तर शरीरात चरबी जमा होण्याचा धोका देखील वाढवू शकते. जरी तुम्हाला कधीकधी खाण्याची इच्छा होत असली तरी, मर्यादित प्रमाणात डार्क चॉकलेटचा एक छोटासा तुकडा खाऊ शकतो.

## पाककला

### गाजराचा भात

**साहित्य :** २ मोठे गाजर, ४ हिरव्या मिरच्या, दोन लवंगा, चार काळी मिरी, एक वेलदोडा, तमालपत्र, दालचिनीचा तुकडा, फोडणीसाठी जीरे मोहरी, हिंग, कढीपत्ता, २ चमचे आले-लसूण पेस्ट, १/४ वाटी मटार, १ कांदा, १ टोमॅटो, १ चमचा लाल तिखट, १/२ चमचा गरम मसाला, २ चमचे तूप, १ चमचा तेल

**कृती :** प्रथम गाजराची साल काढून एक गाजर किसून घ्यावा आणि एका गाजराच्या बारीक फोडी कराव्यात. तांदूळ धुऊन घ्यावेत. गॅसवर कुकर ठेवा. यामध्ये दोन चमचे तूप, एक चमचा तेल घालावे. जीरे, मोहरी, हिंग कढीपत्त्याची फोडणी करा. आले लसूण पेस्ट परतून घ्या. कांदा बारीक कट करून परतून घ्यावा. त्यानंतर टोमॅटो परतून घ्यावेत. हिरवी मिरची परतून घ्या यामध्येच खडे मसाले टाका. कांदा टोमॅटो गुलाबीसर झाल्यानंतर यामध्ये गाजराचे तुकडे गाजराचा कीस हिरवा मटार अशा भाज्या टाकत दोन ते तीन मिनिटे परतून घ्या त्यानंतर तांदूळ परता यामध्ये लाल तिखट मीठ गरम मसाला हे सर्व घालून परता आणि भातामध्ये गरम पाणी घालून झाकण लावून दोन शिट्ट्या करा. पंधरा मिनिटं कुकर थंड होऊ द्या गरम गरम भात दह्यासोबत सर्व्ह करा.

## वास्तू

### टिव्ही कुठे लावावा?

टीव्ही किंवा स्मार्ट टेलिव्हिजन दक्षिण-पूर्व म्हणजेच आग्नेय कोपऱ्यात ठेवावे. इथे ठेवता येत नसेल तर पूर्व दिशेला ठेवावे. टीव्ही पाहताना तुमचा चेहरा पूर्वेकडे असावा याची विशेष काळजी घ्या. आग्नेय कोपऱ्यात किंवा पूर्वेला टीव्ही ठेवायला जागा नसेल तर टीव्ही दक्षिणेकडे आणि तुमचे तोंड उत्तरेकडे अशा प्रकारे ठेवा.

## सल्ला

शेवग्याच्या शेंगा उकडतांना फुटु नये म्हणून त्यात छोटा गुळाचा तुकडा घालावा किंवा मीठ चोळुन ठेवावे

## सौंदर्य

सफरचंद सायडर व्हिनेगर, १ चमचा कच्चा मध आणि १ कप पाणी घ्या. ते चांगले मिसळा आणि टाळूला मसाज करा. टिकवून ठेवतो. याने टाळूचे आरोग्य सुधारते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १० जुलै २०२५

**गुरुपौर्णिमा, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, पू.षा.२९।५६ सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** ज्यांच्याबरोबर आपणास वेळ घालवणे आवडते त्यांना वेळ द्या. घरगुती बाबतीत अधीरता असेल. मागील उधारी वसुल होईल.

**वृषभ :** अनुकूल ते सहकार्य मिळेल. वेळेचे सदुपयोग केल्याने लाभ मिळेल. कौटुंबिक वेळ अनुकूल राहील. काळजीपूर्वक कार्य करा.

**मिथुन :** कामात व्यस्तता अधिक असल्यामुळे आरोग्यावर विपरीत प्रभाव पडू शकतो. आपल्या प्रिय व्यक्तींचा सहवास लाभेल.

**कर्क :** मैत्रिण किंवा प्रेयसी भेटेल. छोट्या-छोट्या अडचणी येतील. कुटुंबिय व मित्रांचा सहवास लाभेल. वरिष्ठांचे मार्गदर्शन लाभेल.

**सिंह :** प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा व आपल्या कौटुंबिक सभासदांचा सहयोग घ्या.

**कन्या :** आरोग्य नरम-गरम राहील. नोकरदार मंडळीनो काळजीपूर्वक काम करा. वाहने व उपकरणे जपून चालवावीत. रखडलेली कामे मार्गी लावू शकाल.

**तूळ :** आपल्या व्यवहारांमध्ये सावधगिरी बाळगा. आजचा दिवस छान जाईल. आरोग्य उत्तम राहिल. मागील उधारी व उसनवारी मिळेल.

**वृश्चिक :** आपल्या कामांमध्ये मित्रांचा सहयोग मिळेल. शत्रूंपासून सावध राहा. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

**धनु :** कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही. मुले त्रास देऊ शकतात. जुने सहकारी भेटल्यामुळे आठवणींना उजाळा मिळेल. आर्थिक व्यवहार जपून करा.

**मकर :** शत्रूंपासून सावध राहाल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळाल. पितृचिंता सतावेल. गुरुजनांचे आशिर्वाद घ्यायला जाल.

**कुंभ :** यवहारांमध्ये सावधगिरी बाळगाल. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही. जुने मित्र-मैत्रिणी भेटण्याची दाट शक्यता आहे.

**मीन:** शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रातील व्यक्तींना दिवस चांगला जाईल. आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील. बाहेरचे जेवण शक्यतो टाळावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२१७ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ५ | ६ | ७ |
| ८ | | | ९ | ■ | १० | | |
| ■ | | ■ | ११ | | | ■ | ■ |
| १२ | | १३ | | ■ | १४ | १५ | |
| | ■ | १६ | | १७ | ■ | | ■ |
| १८ | १९ | ■ | २० | | २१ | ■ | २२ |
| २३ | | २४ | ■ | २५ | | २६ | |
| | ■ | २७ | | | ■ | २८ | |

**आडवे शब्द :-** १) बाग; उद्यान; उपवन ४) विचारविनिमय; खलबत ८) पंजाबमधील एक नदी १०) क्षार; मीठ ११) अगदी लहान पिशवी; चंची १२) स्त्रियांचे एक वस्त्र १४) व्यवस्था; मांडणी १६) एक कंठभूषण; बिल्ला १८) आशीर्वाद; नवरामुलगा २०) प्रशंसा; स्तुती २३) इंग्लंडची राजधानी २५) वाघाचे ओरडणे २७) विश्वास; खात्री २८) सदऱ्याची गुंडी ज्यात अडकवितात ते छिद्र; काम

**उभे शब्द :-** १) एक प्रवासी वाहन २) गीत लिहिणारा किंवा रचणारा ३) चालण्याची ढब; वर्तणूक ५) स्त्रियांचे एक वस्त्र ६) अंगावरील बारीक केस ७) पिकात वाढणारे अनावश्यक गवत ९) जुलमी; श्रेष्ठ; खंबीर १२) दुसऱ्यावर अवलंबून असणारा १३) चहा पिण्याचे एक भांडे १५) मुद्रा; चेहरा १७) फटीतून येणारा प्रकाश किरण १९) रर; रडगाणे २१) कोणत्याही प्राण्यातील पुरुष जात २२) अंतःकरण; कलेजा; हृदय २४) आकाश; गगन; अंबर २६) वडिलांचा भाऊ; चुलता

### शब्दगंध क्र. ७२१६ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | का | स | ■ | का | र | का | र |
| चा | त | क | ■ | क | ळ | क | ळ |
| र | ■ | वा | ज | वी | ■ | ■ | क |
| पू | ■ | र | म | ■ | न | क | ती |
| स | र | ■ | वा | ■ | ग | न | ■ |
| ■ | स | म | ज | दा | र | ■ | सु |
| वा | म | ■ | म | द | ■ | दा | म |
| सा | च | ■ | द | र | व | क | न |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : तडजोड हे आयुष्याचे दुसरे नाव आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### 'भगवा', 'केशरी', 'नारिंगी' हे समानार्थी शब्द आहेत का?

मराठीत शब्दसंकेत असतात तसेच रंगसंकेतही असतात. पांढराशुभ्र, काळाकुट्ट, हिरवागार, लालभडक, पिवळाजर्द, निळाशार वगैरे. तसंच भगवा म्हणजे मराठी राज्याचा झेंडा किंवा सन्याशाची कफनी, केशरी म्हणजे केशराचा किंवा जिलेबीचा रंग, आणि नारिंगी म्हणजे पिकल्या संत्र्याचा किंवा इंद्रिधनुष्याचा एक रंग.

कित्येक वेळा बायका, चटनी रंगाची किंवा बैंगनी रंगाची साडी असं म्हणतात.. वास्तविक चटण्या अनेक रंगाच्या आणि वांगीही अनेक रंगांची असतात. पण चटणी म्हणजे फिकट हिरवा रंग आणि बैंगनी म्हणजे दाट जांभळा रंग. जांभळा रंग हा देखील जांभुळ या फळाच्या रंगावरून आला आहे.

भगवा, केशरी आणि नारिंगी हे शब्द वाटत असले तरी समानार्थी नाहीत. जर रंगाचा निर्देश असेल तर हे तिन्ही शब्द एकाच रंगाच्या विभिन्न छटा दर्शवितात. पण हे शब्द त्यांना वापराने लाभलेल्या अर्थाने पाहता अगदी वेगवेगळे आहेत. उदाहरणार्थ : भगवा झेंडा, भगवी कफनी, केशरी पेढे, केशरी भात, नारिंगी साडी, नारिंगी फेटा !

भगवा झेंडा, भगवी कफनी या शब्दांच्या जोड्यामध्ये अध्यात्म, संन्यास, त्याग याचा आशय स्पष्ट लक्षात येतो. पण जरा शब्दांच्या जोड्या बदलून घेतल्यास - नारंगी झेंडा, नारिंगी कफनी या शब्द-प्रयोगातुन अध्यात्म, संन्यास, त्याग या ऐवजी वेगळा ऐहिक अर्थ प्रतीत होतो. हाच अर्थ नारिंगी साडी आणि नारिंगी फेटा स्पष्टपणे साधे ऐहिक जीवनातील रंगाचा भेद दाखवितो. केसरी दूध, केसरी पेढे, केसर- बर्फी ही नावे खाद्य- पेयांना देऊन हलवाई खप वाढविण्यासाठी त्यात मिसळलेल्या एका उंची उत्तम स्वादाच्या मसाल्याचा निर्देश करतात. नुसता रंग म्हणून यांचा विचार करता हे तिन्ही रंग उष्ण रंगसंगतीत मोडतात. यात प्रामुख्याने पिवळ्या आणि लाल रंगाचे विविध प्रमाणात मिश्रण केलेले असते.

### अहंकारी कावळा

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. हंसांचा एक कळप समुद्रकिनाऱ्यावरून जात होता, त्याच ठिकाणी एक कावळाही मजा करत होता. त्याने हंसांकडे तिरस्काराने पाहिले, तुम्ही लोक खूप छान उडता! कावळा थट्टा करत म्हणाला, तुम्ही लोक आणखी काय करू शकता, तुम्ही फक्त पंख फडफडवून उडू शकता. तुम्ही माझ्याइतक्या वेगाने उडू शकता का? तुम्ही माझ्यासारखे हवेत कलाबाजी करू शकता का? नाही, तुम्हाला उडणे म्हणजे काय हे देखील माहित नाही!

कावळ्याचे ऐकून एक म्हातारा हंस म्हणाला, तुम्ही हे सर्व करू शकता हे चांगले आहे, पण तुम्ही त्याबद्दल अहंकारी होऊ नये. मला अहंकार माहित नाही, जर तुमच्यापैकी कोणी माझ्याशी स्पर्धा करू शकत असेल तर पुढे या आणि मला पराभूत करा. असे कावळा म्हणाला. एका तरुण नर हंसाने कावळ्याचे आव्हान स्वीकारले. स्पर्धा दोन टप्प्यात आयोजित करण्याचे ठरले, पहिल्या टप्प्यात कावळा त्याच्या युक्त्या दाखवेल आणि हंसालाही तेच करावे लागेल आणि दुसऱ्या टप्प्यात कावळ्याला हंसाच्या युक्त्या पुन्हा कराव्या लागतील. स्पर्धा सुरू झाली, कावळा पहिला टप्पा सुरू करून एकामागून एक युक्ती दाखवू लागला, कधी तो गोल गोल फिरत असे आणि कधी तो जमिनीला स्पर्श करत वर उडत असे.


हंस त्याच्याविरुद्ध विशेष काही करू शकला नाही. कावळा आणखी गर्विष्ठपणे बोलू लागला, मी आधीच सांगत होतो की तुम्हाला दुसरे काही माहित नाही. मग दुसरा टप्पा सुरू झाला, हंस उडून समुद्राकडे उडू लागला. कावळाही त्याच्या मागे लागला, तू कोणती युक्ती दाखवत आहे, सरळ उडणे आव्हान आहे का? तू खरोखर मूर्ख आहेस!, कावळा म्हणाला.

पण हंसाने उत्तर दिले नाही आणि शांतपणे उडत राहिला. हळूहळू ते जमिनीपासून खूप दूर गेले आणि कावळ्याचा आवाजही कमी झाला आणि काही वेळाने तो पूर्णपणे थांबला. कावळा आता खूप थकला होता, इतका की त्याला हवेत स्वतःला रोखणेही कठीण होत होते आणि तो वारंवार पाण्याजवळ जात होता. हंसाला कावळ्याची परिस्थिती समजली, पण नकळत असल्याचे भासवत तो म्हणाला, तू पुन्हा पुन्हा पाण्याला का स्पर्श करत आहेस, हीही तुझीच एक युक्ती आहे का? नाही कावळा म्हणाला, मला माफ करा, मी आता पूर्णपणे थकलो आहे आणि जर तुम्ही मला मदत केली नाही तर मी मरेन. मला वाचवा, मी कधीही अभिमान दाखवणार नाही.

हंसाला कावळ्याची दया आली, त्याने विचार केला की किमान कावळ्याला धडा मिळाला आहे, आता त्याचा जीव वाचवणे चांगले होईल, आणि त्याने कावळ्याला त्याच्या पाठीवर बसवले आणि किनाऱ्याकडे परत उडून गेला. मग कावळ्याने हंसाचे आभार मानले.

तात्पर्य : आपल्यात असलेल्या गोष्टींचा कधीही अहंकार करू नये.

## जीवन का अमृत (भाग १)



इस पुस्तक के अध्ययन से आपका रूहानी दृष्टिकोण विस्तृत हो जाएगा और आपकी आंतरिक आध्यात्मिक उन्नति में सहायता मिलेगी ।

दृष्टि-अभ्यासों (ध्यान) में हुई कम उन्नति से आपको निरुत्साहित नहीं होना चाहिए, क्योंकि सतुरु के लुभावने स्वरूप के दर्शनों की भेंट से, जो कि आपको अपने सपनों में प्राप्त हुई है, वास्तव में यह कमी पूरी हो जाती है। आप उसकी दया से समय आने पर उन्नति करेंगे।

दावी ओर से आती हुई पवित्र शब्द की धारा या घंटियों की आवाज़ सही है और इसे एकाग्रचित होकर सुनना चाहिए यह पास आ जाएगी. तीव्र हो जाएगी और अंत में ऊपर से आने लगेगी।

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

इस मार्गदर्शक सिद्धान्त का, कि अंतर में आप जो कुछ भी देखें, उसके बीच में टकटकी लगाकर देखते जाएँ और उस पवित्र शब्द धुन को सुनें, जो कि दायी ओर से आती हो, अवश्य ही तन-मन से पालन करना चाहिए। बाकी सब कुछ उसकी दया से समय आने पर हो जाएगा।

भजन सिमरन में सुरत की धारा के सिमटने की वजह से आपको जो मुश्किल आती है, जो कि आपके सौर चक्र से संबंधित है, वह पेट की खराबी से हो सकती है और हो सकता है कि आपका ध्यान रूह के सिमटने की प्रक्रिया की ओर चला जाता हो। ऐसा तब होता है, जब आप शरीर की ओर से चेतन रहते हैं और आप इसे मिटा सकते हैं, अगर आप अपना ध्यान पूरी तरह दिव्य चक्षु पर टिकाएँ और मन ही मन सिद्ध नामों का जाप करें, बहुत धीरे-धीरे, चाहे रुक-रुककर, ताकि आंतरिक दृष्टि में कोई विघ्न न पड़े। जब आप वापिस शारीरिक चेतनता में लौटें, तो ऐसा धीरे-धीरे करे और एकदम वापिस न आएं। इस तरीके से ऐसे सभी खतरे दूर हो जाएंगे। सारी शोभा और सुंदरता अंतर में है। हमें इस इंसानी जन्म के असली उद्देश्य यानि आध्यत्मिक निपुणता के लिए कार्य करना है, पवित्र नाम का नियमित रूप से और श्रद्धा के साथ अभ्यास करके। धीमा पर अटल रहने वाला दौड़ को जीत सकता है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

अगर आप चाहते हैं मन में सदैव सकारात्मक विचार चलते रहें तो इसकी सब से आसान विधि यह है कि कोई सकारात्मक चित्र मन में देखते रहें। कभी लक्ष्मी नारायण को देखते रहें। भगवान/ईष्ट को देखते रहें। कोई देवता को देखते रहें। कोई फूल, कोई बगीचा कोई पेड़ या कोई अच्छी भावना की छवि देखते रहें। अपने अच्छे लक्ष्य को देखते रहें।

आज्ञा चक्र -३१-

मन- नाकारात्मक विचारो का रुप

कोई भी चीज जब घूमती है तो उस की शक्ति बढ़ जाती है। जितनी ज्यादा तेजी से घूमती है उतनी ही शक्तिशाली बनती जाती है। अंत में वही वस्तु एक हथियार के रुप में काम करने लगती है। एक पंखे में तीन पंखडियां होती हैं। जब हम उसे फुल स्पीड से चलाते हैं। तो ऐसे लगता है जैसे एक ही पंख है। अगर इसकी गति और बढा दी जाये तो पंखे के बजाय प्रकाश दिखने लगेगा। इस स्थिति में पंखा किसी दूसरे पर गिरा दें तो यह एक घातक हथियार की तरह उसको नष्ट कर देगा।

### आज्ञा चक्र

बंदूक में गोली जब चलती है तो यह बंदूक के अन्दर घूमती हुई जाती है जिस से इस की शक्ति बढ़ जाती है और विनाश का काम करती है। ऐसे ही किसी नाकारात्मक शब्द को मन में रिपीट करते हैं। तो यह शब्द शक्तिशाली बनता है और अंत में एक सूक्ष्म शस्त्र बन जाता है और वैसा ही विनाशक प्रभाव दूसरे पर होता है जैसे कोई हथियार का होता है।

जब हम क्रोध करते हैं तो क्रोध के ये संकल्प एक अंगारे का रुप ले लेते है। अगर इस का करीलियन कैमरे से फोटो लेवें तो ऐसे लगेगा कि क्रोधी व्यक्ति के मुंह से आग के अंगारे निकल रहे हैं और दूसरे व्यक्ति पर गिर रहे हैं। उस व्यक्ति को मन में वैसी जलन होती है जैसे सचमुच में आग के अंगारे गिरने पर होती है। इसलिये जब कोई क्रोध करता है तो सभी को बहुत घबराहट होने लगती है। क्रोधी व्यक्ति से हर कोई दूर भागने लगता है।

जब कोई सोचता है कि विरोधी को तलवार से घायल करूंगा तब उस के संकल्प तलवार का रूप धारण कर लेते हैं तथा दूसरे को जो अपशब्द बोलते हैं तो उसे ऐसे लगेगा जैसे तलवार से घायल कर रहा है। जिसे प्रायः कहते हैं इसकी जबान कैंची की तरह तेज है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**राणी :** हिंदी भाषेपेक्षा आपली मराठी चांगली आहे

**रवी :** ते कसे काय?

**राणी :** हिंदीमध्ये 'अ न प ढ' असे संपूर्ण म्हणावे लागते, मराठीत तर फक्त 'ढ' म्हटले तरी चालतय

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारतात ५४ सेवा सुरू करणारी पहिली दूरसंचार कंपनी कोणती?

- एअरटेल

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

समागम करावा. या गर्भधान संस्काराने बाळ तेजस्वी सुदृढ, सुसंस्कारित व बुद्धिमान होते. याबद्दलची विस्तृत शास्त्रोक्त माहिती माझ्या 'आयुर्वेदिक गर्भसंस्कार' या पुस्तकात दिलेली आहे.

**२. गर्भधारणेमध्ये घ्यावयाची काळजी :**

गर्भावस्थेमध्ये भावी मातेच्या आहार-विहाराची काळजी घेऊन तिचे शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम ठेवले, तर नक्कीच बाळ सुदृढ व बुद्धिमान होते, हे संशोधनाद्वारे आता सिद्ध झाले आहे. म्हणून गर्भवतीने सकस आहार घेणे, सुमधुर संगीत ऐकणे, वाचन करणे, गर्भस्थ बाळाशी सुसंवाद साधणे या उपक्रमातून बाळाची बौद्धिक क्षमता नक्कीच वाढीस लागते. गर्भावस्थेमध्ये ऐकलेले संगीत प्रसूतीनंतर बाळास ऐकविले, तर बाळ लगेचच रडायचे थांबते.

### बौद्धिक विकास कसा करावा?

**पुंसवन संस्कार -**

आयुर्वेदामध्ये बाळ दीर्घायुषी तेजस्वी, सारवान व बुद्धिमान होण्यासाठी पुंसवन संस्कार सांगितला आहे. अल्पबुद्धी असणाऱ्या दाम्पत्याचे बाळसुद्धा या संस्काराने बुद्धिमान होते. यामध्ये डाव्या किंवा उजव्या नाकपुडीमध्ये दूर्वारस किंवा वटांकुररस चार थेंब टाकावा. गर्भधारणेमध्ये घ्यावयाची काळजी याबद्दलची विस्तृत माहिती आपण 'आयुर्वेदिक गर्भसंस्कार' या माझ्या पुस्तकात वाचावी.

जन्म झाल्यापासून बाळाला शिकवा : बाळाची पाचही इंद्रिये-श्रोत, त्वक्, चक्षु, रसना, घ्राण जन्मलेल्या क्षणापासून कार्यरत असतात. या इंद्रियांमार्फत बाळ आजूबाजूच्या जगाचा अनुभव घ्यायला सुरुवात करते.

प्रत्येक बाळ प्रेमाला भुकेलेले असते. आपल्याला जवळ घ्यावे, कुरवाळावे, ओळखीचा आवाज ऐकू यावा. आपली आई आपल्या समोर कायम असावी. ओळखीचे चेहरे दिसावेत. आपल्याशी सारखे कोणीतरी बोलावे, हसावे असे त्याला नेहमी वाटत असते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

## पदमशाली कायदेशीर सल्लागार समितीवर ॲड. व्यंकटेश सिरसूल, ॲड. सौ. सुजाता बोडखे व ॲड.दिपक मच्चा यांची बिनविरोध निवड





नगर - पद्मशाली पंचकमिटी ज्ञाती समाजाच्या वतीने समाजातील वकिलांची बैठक घेऊन त्रिसदसिय कमिटी स्थापन करण्यात येऊन या समिती वर ॲड. व्यंकटेश सिरसूल, ॲड.सौ. सुजाता बोडखे व ॲड. दिपक मच्चा यांची बिनविरोध निवड झाल्याची माहिति पंचकमिटीचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्ञा यांनी दिली.

पद्मशाली समाजातील सर्व वकिलांची नुकतीच बैठक पंचकमिटीच्या वतीने झाली. समाजातील नागरिकांना कायदेशीर सल्ला सुलभ रीतीने मिळावे, समाजामध्ये पती पत्नी वाद, कौटुंबिक वाद संपुष्टात येणे कामी या समितीचे गठण केले असून याचा लाभ समाजाने घ्यावा, असे आवाहन श्री मार्कंडेय देवस्थानचे अध्यक्ष गणेश विद्ये यांनी दिले.

सदर स्थापन केलेली कमिटी ही एक वर्षाकरिता असून त्या नंतर नवीन कमिटी नेमण्यात येईल. तसेच या कमिटीमध्ये इतर सदस्य म्हणून ॲड. देविदास गाली, ॲड.नोटरी मोहन येनगंदूल, ॲड.नोटरी प्रमोद जेटला, ॲड. नोटरी राजू गाली, ॲड.महेश आनंदास, ॲड. गौरी सामलेटी, ॲड.लक्ष्मीछाया रामदिन, ॲड. प्रतीक्षा मंगलराम व ॲड.लक्ष्मी लखापती यांची निवड केली असून कमिटीचे मार्गदर्शक म्हणून ॲड. पांडुरंग बल्लाळ व ॲड.दिपक जेटला यांची नेमणूक करण्यात आली. या बैठकीत सर्व वकिलांनी चर्चेत भाग घेऊन सर्वानुमते ॲड.. सिरसूल, ॲड.बोडखे व ॲड. मच्चा यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

लवकरच प्रत्येक आठवड्याचे शनिवारी व रविवारी दोन तास कायदेशीर मार्गदर्शन मार्कंडेय संकुल येथे वकिलांच्या वतीने देण्यात येईल व त्याचे नियोजन लवकरच करण्यात येईल अशी माहिती जेष्ठ विश्वस्त ॲड. कुमार आडेप यांनी दिली.

यावेळी पंचकमिटी व देवस्थानचे ज्ञानेश्वर मंगलारप, अमित बुरा, विनोद बोगा, पुरषोत्तम बुरा, त्रिलेश येनगंदुल आदी उपस्थित होते.

## एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सव समितीवर अहिल्यानगरचे विनायक देशमुख यांची नियुक्ती



नगर - पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी स्थापन झालेल्या एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव जिल्हा समितीवर विनायकराव देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागाने पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांचा आणि त्यांच्या अंत्योदय संकल्पनेचा प्रचार प्रसार करण्यासाठी विशेष पुढाकार घेतला असून त्या अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील उपक्रमांच्या नियोजनासाठी व अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव समित्या स्थापन केल्या आहेत. त्या अंतर्गत जलसंपदा मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्या शिफारसीनुसार राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी विनायकराव देशमुख यांची अहिल्यानगर जिल्हा एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव समितीचे सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.

यासंदर्भात ना. मंगलप्रभात लोढा यांनी राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन केले आहे, अशी माहिती श्री.देशमुख यांनी दिली.



डॉ. सांगळे हॉस्पिटलच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त मोफत उपचार शिबिराचा दीपप्रज्वलनाने प्रारंभ करण्यात आला.

## डॉ. सांगळे हॉस्पिटलच्या वर्धापन दिनानिमित्त मोफत उपचार शिबिरात १५० रुग्णांची तपासणी

नगर - बुरुडगाव रस्त्यावरील सांगळे हॉस्पिटल येथे ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या मोफत किडनी रोग निदान व उपचार शिबिरात सुमारे १५० रुग्णांची तपासणी करण्यात आल्याची माहिती डॉ. रंगनाथ सांगळे व डॉ. अमेय सांगळे यांनी दिली.

या शिबिरात डॉ. सांगळे पिता-पुत्र यांनी रुग्णांची तपासणी केली. मोफत निदान व उपचारासह किडनी, प्रोस्टेट, मुतखडे व मूत्ररोग आदि विकारांवर या शिबिरात मोफत उपचार करण्यात आले. शिबिरात शस्त्रक्रियेची आवश्यकता असणार्या रुग्णांवर सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया करण्यात आली. शिबिरात जिल्ह्याच्या दक्षिण भागातील पाथर्डी, शेवगाव, पारनेर, आष्टी, कडा येथील रुग्णांनी नोंदणी केली होती, अशी माहिती रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली.

डॉ. रंगनाथ सांगळे हे गेल्या सुमारे ३५ वर्षांपासून शहरात बुरुडगाव रस्ता येथे आपली यशस्वी सेवा देत आहेत. रुग्णांसाठी अत्याधुनिक मशिनरी या हॉस्पिटलमध्ये उपलब्ध केल्यामुळे रुग्णांवर विनात्रास उपचार होत आहेत. डॉ. सांगळे यांच्या अत्याधुनिक हॉस्पिटलमध्ये ३-डी / कलर डॉप्लर सोनोग्राफी, युरोफ्लोमेट्री, आरआयआरएस (विना टाका लेसर शस्त्रक्रिया), टीयूआरपी दुर्बिणीद्वारे प्रोस्टेट, यूआरएसएल (बिना ऑपरेशन मुतखडा काढणे), टीयूआरबीटी (मूत्राशयाचा कॅन्सर), क्रिस्टोस्कोपी (मुतखड्याचे दुर्बिणीद्वारे परिक्षण) आदि सुविधा उपलब्ध आहेत.

# ‘नगर आयव्हीएफ सेंटर’चा १० जुलैला लोकार्पण सोहळा

### वंध्यत्व निवारणासाठी प्रथमच शहरातील ७ महिला स्त्रीरोग तज्ञांचा एकत्र उपक्रम



नगर - अहिल्यानगर येथे वंध्यत्व निवारण उपचारांसाठी नगर आयव्हीएफ सेंटर सुरू होत असून या सेंटरचा लोकार्पण सोहळा गुरुपौर्णिमेच्या दिवशी १० जुलै रोजी होणार आहे. स्पर्श मातृत्वाचा, स्पर्श सुखाचा हे ब्रीदवाक्य घेऊन शहरातील ७ महिला स्त्रीरोगतज्ञ एकत्र येऊन या सेंटरचा प्रारंभ करीत आहेत. या सेंटरचे उद्घाटन संध्याकाळी ६ वाजता आमदार संग्राम जगताप, खासदार निलेश लंके, डॉ. सुजय विखे, नगरसेवक धनंजय जाधव, सौ. शीतलताई जगताप, सौ. धनश्रीताई विखे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नागरगोजे, म.नपा. वैद्यकीय अधिकारी डॉ. राजूरकर, आय. एम. ए. चे अध्यक्ष डॉ. सी. डी मिश्रा यांच्या हस्ते होणार आहे.

शहरातील लाल टाकी रोडवरील ब्ल्यू स्टोन या नवीन इमारतीमध्ये हे आयव्हीएफ सेंटर सुरू होत आहे. शहरातील डॉ. सौ. रेणुका पाठक, डॉ. पद्माकांती कुलकर्णी, डॉ. मृणाल वाघ, डॉ. मुग्धा साताळकर तन्वर, डॉ. किर्ती भावले सोलाट, डॉ. प्रज्ञा जोशी, डॉ. मधुरा घुमरे या ७ अनुभवी स्त्री रोग तज्ञांनी ही सेवा उपलब्ध करून दिली आहे.

या सेंटर मध्ये वंध्यत्व निवारणासाठी अत्याधुनिक उपचार पद्धती, सुविधा व तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सुसज्ज आय व्ही एफ लॅब, ऑपरेशन थिएटर, मेडिकल, लॅबोरेटरी सुविधा, स्पेशल व डिलक्स रूम्स आणि अनुभवी स्टाफ ही या सेंटरची वैशिष्ट्ये आहेत. नगर आयव्हीएफ सेंटर मध्ये आय.यु.आय., आय. व्ही. एफ., इकसी (ICSI), टेसा (TESA), पेसा (PESA), सरोगसी, स्त्री व पुरुष बीज फ्रीझींग, डोनर ट्रीटमेंटस असे सर्व अद्ययावत पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे आता वंध्यत्व निवारण उपचारासाठी पुणे, मुंबई व अन्य शहरात जाण्याची गरज नाही.

आय. व्ही. एफ. म्हणजे 'इन विट्रो फर्टिलायझेशन' होय. याचा अर्थ कृत्रिम गर्भधारणा होय. जेव्हा नैसर्गिकरीत्या गर्भधारणा होण्यासाठी जोडप्यांना अडचणी येतात तेव्हा वंध्यत्व निवारणासाठी आय. व्ही. एफ. चा उपयोग केला जातो. इकसी (ICSI) मुळे वंध्यत्वाच्या समस्या असलेल्या जोडप्यांमध्ये गर्भधारणेची शक्यता वाढते.

या सेंटर मध्ये बारा वर्षांहून अधिक अनुभव असणारे फर्टिलिटी कन्सल्टंट्स, पूर्णवेळ अँड्रोलॉजिस्ट (पुरुष वंध्यत्व तज्ञ) उपलब्ध आहेत. तसेच वंध्यत्व निवारण उपचारासाठी कायदेशीर मार्गदर्शन सुद्धा सेंटर द्वारे दिले जाणार आहे.

एका छताखाली वंध्यत्व निवारणासाठी आवश्यक सर्व सुविधा व वैद्यकीय उपचार नगर आयव्हीएफ सेंटरने उपलब्ध करून दिले आहेत. गर्भधारणेसाठी अडचणी येणाऱ्या जोडप्यांसाठी हा एक नवा आश्वासक आशेचा किरण ठरेल.



भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात नगरच्या गिरीजा दुधाट हिला तरुण इतिहास संशोधक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## ‘तरुण इतिहास संशोधक पुरस्कार’ नगरच्या गिरीजा दुधाट हिला प्रदान

नगर - भारत इतिहास संशोधक मंडळाचा ११५ वा वर्धापन दिनाचा कार्यक्रम ७ जुलैला पुण्यामध्ये पार पडला. यावेळी या मंडळातर्फे दिला जाणारा श्रीकांत चौगुले पुरस्कृत 'तरुण इतिहास संशोधक' पुरस्कार नगरची युवा पुरातत्त्वज्ञ व शस्त्र अभ्यासक गिरीजा दुधाट हिला जेष्ठ इतिहास अभ्यासक नरेंद्र मुरकुंबी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर पुणे महापालिकेच्या वारसा जतन समितीचे अध्यक्ष चंद्रकांत दळवी, इतिहास अभ्यासक श्रीकांत चौगुले, जेष्ठ उद्योजक अजित गाडगीळ, मंडळाचे अध्यक्ष प्रदीप रावत, सचिव पांडुरंग बलकवडे आदी उपस्थित होते.

यावेळी गिरीजा दुधाट हिने संशोधक आणि संशोधनाची दीर्घ परंपरा लाभलेल्या या मंडळाकडून हा पुरस्कार मिळणे हा माझ्या व नगर साठी खुप अभिमानाचा क्षण असून या मंडळाने माझ्या कार्याची घेतलेली दाखल ही निश्चितच माझ्या पुढील वाटचालीस प्रेरणादायी ठरणारी आहे असे सत्काराला उत्तर देताना सांगितले.

गिरजा दुधाट हिने बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड युनिव्हर्सिटीमधून आर्किऑलॉजी ची पदवी घेतली असून त्यानंतर युनिव्हर्सिटी ऑफ लंडन इथून याची मास्टर ची डिग्री घेतलेली आहे. तिचे 'शस्त्रवेध' हे मध्ययुगीन भारतीय शस्त्रास्त्रांची माहिती असणारे पुस्तक ही प्रकाशित झालेले असून जगभरात तिचे या विषयावरील शोध निबंध प्रकाशित झालेले आहेत.



## आषाढी एकादशीनिमित्त विशेष बालवारकऱ्यांची विशेष वारी

आषाढी एकादशी निमित्त ५ जुलै रोजी नगरमधील मन:स्फूर्ती प्रतिष्ठान संचलित ' मी राजहंस', लर्निंग डेव्हलपमेंट अॅण्ड मल्टी थेरपी सेंटर फॉर चिल्ड्रन या सेंटरमधील विशेष मुलांची दिंडी आयोजित करण्यात आली होती. लहान मुलांमधील ऑटिझम (स्वमग्नता) ए.डी.एच.डी (अति चंचलता) लर्निंग डिसबिलिटी (अध्ययन अक्षमता) या समस्यांवर 'मी राजहंस' हे सेंटर विविध उपचार पद्धतीद्वारा काम करते. विशेष बाल वारकऱ्यांची ही दिंडी सर्वांसाठीच विशेष आकर्षण ठरली. या प्रसंगी अहिल्यानगर चे निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, मन:स्फूर्ती प्रतिष्ठानचे अध्यक्ष मधुकर काळे, संस्थेतील पदाधिकारी संतोष आहेर व दीपाली आहेर तसेच'मी राजहंस ' सेंटरच्या संचालिका तेजस्विनी आहेर व पालक आदी उपस्थित होते. या दिंडीसाठी सेंटरच्या टीमने मेहनत घेतली.

## गुरुपौर्णिमेनिमित्त प्रकाश नेत्रालयात १० जुलैला मोफत नेत्र तपासणी शिबिर

### चाळीशीनंतरचा चष्मा घालवणे विषयावर डॉ.राजीव चिटगोपेकर यांचे मार्गदर्शन

नगर - प्रकाश नेत्रालयात गुरुपौर्णिमेनिमित्त १० जुलै रोजी सकाळी १० ते दु. २ वा. पर्यंत मोफत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये डोळ्यांची तपासणी करुण औषधोपचार करण्यात येणार आहेत. नेत्र शस्त्रक्रिया तसेच लेसीक उपचार पद्धतीवर सवलत देण्यात येणार आहे. डोळ्यांची तपासणी करून घ्यावी व नेत्र शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी नगर-मनमाड रोडवरील आय.सी.आय.सी.आय. बँकेच्या वर, प्रकाश नेत्रालय पहिला मजला, सावेडी, अहिल्यानगर मोबाईल नंबर.९४२०४६१११७ येथे संपर्क साधावा.

टीव्ही नाईन या वृत्तवाहिनीवर १३ जुलै रोजी दुपारी ३.२० वाजता आरोग्यम् धनसंपदा या कार्यक्रमांमध्ये चाळीशीनंतरचा चष्मा घालवणे या विषयावर डॉ. राजीव चिटगोपेकर हे मार्गदर्शन करणार आहेत, याचाही लाभ सर्वांनी घ्यावा असे ते म्हणाले.

## ‘गरुडझेप : आग्रा ते राजगड’ यावर अहिल्यानगरमध्ये १३ जुलै रोजी ‘एक गौरवशाली ऐतिहासिक व्याख्यान’



नगर - नगरचे जिगर आणि श्री शंभू छत्रपती राज्याभिषेक सोहळा समिती राजधानी रायगड (अहिल्यानगर विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने 'गरुडझेप : आग्रा ते राजगड' या विषयावर एक गौरवशाली ऐतिहासिक व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हे व्याख्यान छत्रपती शिवाजी महाराजांच्या अद्वितीय धाडसाचे, मुत्सद्देगिरीचे व स्वराज्य स्थापनेच्या प्रवासाचे वैचारिक पर्वणी ठरणार आहे.

या कार्यक्रमात इतिहास संशोधक, अभ्यासक व 'मऱ्हाठा पातशाह' या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक केतन कैलाश पुरी आपल्या ओघवत्या शैलीतून छत्रपती शिवरायांचे धाडस, दूरदृष्टी, आणि सामाजिक-राजकीय निर्णयक्षमता यांचा मागोवा घेणार आहेत. 'गरुडझेप' हे केवळ एक ऐतिहासिक प्रसंग नाही तर आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी धडा आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आग्र्याच्या दरबारात स्वाभिमानाने उभे राहत स्वराज्याची प्रतिष्ठा जपली आणि अचाट धाडसाने मावळ्यांसह सुटका करून घेतली. याच इतिहासाचे दस्तावेजीकरण म्हणजे हे व्याख्यान - 'गरुडझेप : आग्रा ते राजगड'. हा कार्यक्रम १३ जुलै रोजी सायंकाळी ५:३० ते ९ दरम्यान माऊली सभागृह, अहिल्यानगर येथे होणार आहे.

हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून, शिवप्रेमी व इतिहासप्रेमींनी आपल्या परिवारासह उपस्थित राहून स्वराज्य निर्मितीचा तेजस्वी इतिहास अनुभवावा, असे आवाहन आयोजकांतर्फे नगरचे जिगर व श्री शंभू छत्रपती राज्याभिषेक सोहळा समिती, रायगड (अहिल्यानगर विभाग) यांच्याकडून करण्यात आले आहे.

## पद्मशाली समाजाचा बागुलू पंडूगू ११ जुलैला साजरा होणार

नगर - पद्मशाली समाजाचा बागेचा सण (बागुलू पंडुगू) दरवर्षी आषाढ शुद्ध पौर्णिमेनंतर येणाऱ्या शुक्रवारी, ११ जुलै रोजी साजरा होत आहे. पद्मशाली समाजामध्ये गेल्या कित्येक वर्षापासून बागुलू पंडूगू हा सण म्हणजे बागेचा सण मोठ्या थाटात साजरा केला जातो, अशी माहिती पंच कमेटी पद्मशाली ज्ञाती समाजाचे अध्यक्ष संजय वल्लाकट्टी यांनी दिली.

या दिवशी समाजातील प्रत्येक घरामध्ये गोड पुरी, मेथीची भाजी असे नैवेद्य पोषम्मा देवी व लक्ष्मीआई देवीला दाखवत व प्रत्येक जनसमुदायाकडून मिरवणूक काढून पोतराज यांना बरोबर घेऊन शितळादेवी मंदिर व बालिकाश्रम रोडवरील जाधव मळ्यातील लक्ष्मीदेवी मंदिरामध्ये जाऊन पूजाअर्चा करणे असे विधी होतात. या ठिकाणी मोठी जत्रा भरते.

हे सर्व करण्यामागचा हेतू असा आहे की, समाजातील लोक यादिवशी देवीला साकडे घालून निसर्गाचे रक्षण कर, तसेच पर्जन्यवृष्टी संतुलित होऊ दे व कुठेही दुष्काळ अगर अतिवृष्टीने नुकसान होऊ नये, अशी प्रार्थना केली जाते. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये नगर शहरात बागुलू पंडुगू सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. हे बहुतांश लोकांना माहित आहे. या सणासाठी बाहेरगावाहून खास नगर येथे पाहुणेमंडळी येऊन हा सण साजरा करतात. या दिवशी तोफखाना व बालिकाश्रम रोड या दोन्ही मंदिरात यात्रा भरणार असल्याचे दोन्ही मंदिराच्या पदाधिकाऱ्यांनी जाहीर केले आहे.

या दिवशी शितळा देवी (पोशम्मा तल्ली) आणि लक्ष्मीमाता (लचमम्मा तल्ली) यांची यथासांग पूजा अर्चना केली जाते तथा लक्ष्मी मातेची जत्रा असते. या सणाचे वैशिष्टे म्हणजे शितळादेवी (पोशम्मा) व लक्ष्मीआई (लचमम्मा) या देवींना नैवेद्य दाखवणे. हा नैवेद्य दाखवण्या-मागे प्रमुख उद्देश असे आषाढ महिन्यात रोगराईचा वेगाने फैलाव होतो ही रोगराई थांबवून आम्हा सर्वांना चांगले आरोग्य प्रदान कर, अशा प्रकारचे साकडे देवीला घालण्याची पारंपारीक प्रथा आहे.

शितळादेवीच्या नावातच 'शित'पणा आहे, त्यामुळे या देवीला थंड पदार्थाचे नैवेद्य अर्पित करतात. जसे दही, हळद टाकलेला भात, गोडपुरी, मेथीची भाजी, लिंबाची पाने, फुटाणे, नारळ, ओवा, आणि थंड पाणी इ. स्त्रिया आपल्या डोक्यावर थंड पाण्याचा कलश घेऊन वाजत गाजत मिरवणूक काढतात. या कलशात लिंबाच्या पानाच्या डहाळ्या असतात. ही मिरवणूक गावाबाहेर असलेल्या पोचम्मा व लचमम्मा देवीच्या मंदिरापर्यंत जाते. या कलशाची स्थापना देव्हाऱ्यात केली जाते, त्यानंतर नैवेद्य अर्पण केला जातो व सण साजरा केला जातो. समाजबांधवांना आणि सर्वांनाच बागुलापंडुगाच्या शुभेच्छा संजय वल्लाकट्टी यांनी दिल्या.

## बालक मंदिर महिला मंडळची आषाढी निर्मलवारी



विठ्ठल विठ्ठल गजरीच्या तालावर बाल वारकऱ्यांची दिंडी परिवर्तन प्रतिष्ठान संचलित बालक मंदिर महिला मंडळ शाळा, पालवी शिशुविहार यांनी आषाढी एकादशी निमित्त दिंडीचे आयोजन केले होते.

नगर - विठ्ठल विठ्ठल गजरीच्या तालावर बाल वारकऱ्यांची दिंडी परिवर्तन प्रतिष्ठान संचलित बालक मंदिर महिला मंडळ शाळा, पालवी शिशुविहार यांनी आषाढी एकादशी निमित्त दिंडीचे आयोजन केले होते.

दिल्लीगेट येथील बालक मंदिर महिला मंडळ शाळेपासून खाकीदास बाबा मठापर्यंत दिंडी काढली. त्यानंतर खाकीदास बाबा मठात विद्यार्थ्यांनी रिंगण केले. मुलामुलींनी वारकऱ्यांचा वेश परिधान करून हातात टाळ घेतले होते. छोट्या मुलींनी डोक्यावर तुळस घेऊन विठ्ठल नामाचा गजर केला. तसेच मुलांनी भगवी पताका खांद्यावर घेऊन दिंडीत सहभाग घेतला. फुलांनी सजवलेल्या पालखीत विठ्ठल रखुमाई ची मूर्ती ठेवली होती. यावेळी विठ्ठल नामाची शाळा भरली, रखुमाई रखुमाई, विठ्ठल विठ्ठल गजरी यासारखी भजने विद्यार्थ्यांनी म्हटली. विद्यार्थ्यांनी फुगडी खेळण्याचा आनंद लुटला. महिला मंडळ शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अस्मिता शूळ यांनी बाल वारकऱ्यांचे कौतुक केले.

यावेळी विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आले. या सोहळ्यासाठी अहमदनगर महिला मंडळ संस्थेच्या अध्यक्षा सौ. ज्योती केसकर, परिवर्तन प्रतिष्ठानचे संचालक डॉ. अरुण कुलकर्णी, सचिव डॉ.अनिकेत घोटणकर आदि उपस्थित होते. या दिंडी सोहळ्यासाठी पालवी शिशुविहारच्या सौ. मुग्धा घोटणकर व सहकारी शिक्षिका तसेच व बालक मंदिर महिला मंडळ शाळेच्या सर्व शिक्षिका यांनी परिश्रम घेतले.

## आयएमएस व टीसीएस यांच्या संयुक्त उपक्रमाने अहिल्यानगरमध्ये ११ जुलै रोजी नोकरी मेळावा

नगर - पुणे येथील टिसीएस कंपनीने नगरमधील आयएम एससीडीआर कॉलेजमध्ये ११ जुलै रोजी रोजगार मेळावा आयोजित केला आहे. मुलांनी याचा फायदा घ्यावा असे संस्थेचे डायरेक्टर डॉ.एम.बी. मेहता, डॉ.विक्रम बार्नबस आणि प्रा. सुरेश खन्ना यांनी म्हटले आहे.

मेळावा ११ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजता सुरू होईल. मुलाखतीसाठी मुलांनी आपल्या १०वी, १२वी आणि पदवीचे मूळ कागदपत्रे आणि आधार कार्ड आणावे. रोजगार मेळावा सर्व पदवीधारकांसाठी खुला असून इच्छुकांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहिती साठी प्रा. सुरेश खन्ना यांना संपर्क करावा. मो. ९८३४०९२७८३.

## महिलेस मारहाण केल्याच्या खटल्यातून आरोपीची निर्दोष मुक्तता

नगर - अंतर्गत वादातून महिलेस मारहाण केल्याच्या खटल्यातून आरोपीची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली. ८ जुलै रोजी हा निकाल देण्यात आला.

१२ फेब्रूवारी २०२१ रोजी फिर्यादी धुण्या भांड्याचे कामकाज करून गंगा उद्यान शेजारील रस्त्याने पायी घरी जात असतांना लक्ष्मी मातेच्या मंदिरासमोर पती सोबत काम करणारा आरोपी आला व फिर्यादीस म्हणाला की, माझ्यासोबत बुऱ्हानगरला चल. असे म्हंटल्यावर फिर्यादीने नकार दिला व तिच्या पतीला फोन केला व सदर प्रकार सांगणार तेवढ्यात आरोपीने तिचा फोन हिसकावून घेतला. सदर गोष्टीचा आरोपीस राग आल्याने आरोपीने रागात फिर्यादीच्या तोंडावर बुक्का मारला तसेच हातातील लोखंडी कडयाने तोंडावर मारून तिचे दात पाडुन तिला रक्तबंबाळ केले व सदर प्रकार कोणास सांगितला तर तुला जिवंत सोडणार नाही असे म्हणुन तिथुन पळून गेला. अश्या आशयाची फिर्याद तोफखाना पोलिस स्टेशन येथे दाखल करून भा.दं.वी. कलम ३२४, ३२५, ३२६, ५०६ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला होता. संपूर्ण प्रकरणाचा तपास करून पोलिसांनी आरोपीविरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर खटल्यात सरकार पक्षाच्या वतीने एकुण ७ साक्षीदार तपासण्यात आले.

साक्षीदारांच्या जबाबातील विसंगती व आरोपीच्या वतीने ॲड. कौस्तुभ कुलकर्णी यांनी घेतलेला उलटतपास तसेच मांडलेला बचाव आणि युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरून आरोपी विरुद्ध सबळ पुरावा नसल्याने व सरकार पक्ष आरोपी विरुद्ध केस सिध्द करू न शकल्याने न्यायालयाने आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे.

आरोपी तर्फे ॲड. कौस्तुभ कुलकर्णी यांनी काम पाहिले व ॲड. गणेश शेटे यांनी त्यांना सहकार्य केले.

# तीन महिन्यांचा घनकचरा कर माफ करावा

## माजी नगरसेवक निखिल वारे यांची मनपाकडे मागणी

नगर – नगर शहरातील सध्या निर्माण झालेली घनकचरा संकलनाची स्थिती ही चिंतेचा विषय बनलेली आहे. गेल्या तीन महिन्यांपासून संपूर्ण शहरात कचरा संकलनाचे नियोजन पूर्णपणे ढासळले आहे. कुठे आठवडाभर कचरा उचलला जात नाही, तर कुठे नागरिकांना दुर्गंधी, रोगराई, आणि अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या तीन महिन्यांचा घनकचरा कर तात्काळ माफ करण्यात यावा, या मागणीचे निवेदन माजी नगरसेवक निखिल वारे यांनी सहायक आयुक्त सपना वसावा यांना दिले.



तीन महिन्यांचा घनकचरा कर माफ करावा, या मागणीचे निवेदन सहायक आयुक्त सपना वसावा यांना देताना माजी नगरसेवक निखिल वारे.

निखिल वारे यांनी सांगितले की, शहरातील अहिल्यानगर, सावेडी, भोसलेनगर, नागापूर, रेल्वे स्टेशन परिसर, आणि अनेक रहिवासी व व्यावसायिक भागात गेल्या कित्येक आठवड्यांपासून कचरा संकलनासाठी वाहनच आलेले नाही. नागरिक वारंवार तक्रार करत असतानाही प्रशासनाचे दुर्लक्ष हे दुर्भाग्यपूर्ण आहे. महापालिकेने ज्या एजन्सीकडे कचरा संकलनाचे कंत्राट दिले आहे, त्यांनी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास स्पष्टपणे अपयशच दर्शवले आहे. या बेजबाबदार कारभारामुळे शहरात दुर्गंधी पसरलेली असून, संपूर्ण नगरचे 'बकालीकरण' झालेले आहे.

शहरातील नागरिकांकडून दरवर्षी लाखो रुपयांचा घनकचरा कर वसूल केला जातो, परंतु त्या मोबदल्यात त्यांना कोणतीही मूलभूत सुविधा मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळलेली आहे. शहरातील रस्ते, गल्ली–बोळ, बाजारपेठा या सर्व ठिकाणी कचऱ्याचे ढिग साचले आहेत. एकीकडे करोडो रुपये खर्चून रस्ते तयार केले जात आहेत, पण दुसरीकडे घनकचरा व्यवस्थापनाच्या निष्क्रियतेमुळे तेच रस्ते पुन्हा अस्वच्छतेने भरले जात आहेत.

नागरिकांनी कर भरून जर सेवाच मिळत नसेल, तर तो कर माफ करणे ही नैतिक जबाबदारी महापालिकेची आहे. कचरा उचलला गेला नाही, गाडी आली नाही, आणि सेवा मिळाली नाही–हेच वास्तव असेल, तर नागरिकांचा कर वसूल करणे अन्यायकारक आहे, असेही वारे यांनी नमूद केले.

**महापालिकेकडे करण्यात आलेल्या मागण्या**

१. गेल्या तीन महिन्यांचा घनकचरा कर तात्काळ माफ करण्यात यावा.

२. ज्या भागात नियमितपणे कचरा उचल झाला नाही, त्या भागासाठी विशेष मोहीम राबवून तातडीने स्वच्छता करण्यात यावी.

३. कचरा संकलन पुन्हा पूर्णपणे सुरळीत सुरू होईपर्यंत कोणत्याही नागरिकाकडून घनकचरा कर वसूल करू नये.

४. कंत्राटी एजन्सीवर दंडात्मक कारवाई करून नवीन व जबाबदार एजन्सी नेमण्याचा विचार करण्यात यावा.

स्वच्छ भारत, सुंदर नगर ही संकल्पना फक्त बॅनरपुरती राहू नये, तर ती जमिनीवर उतरली पाहिजे. नागरिकांचे आरोग्य, सन्मान आणि पैसा या तिन्ही बाबींचा विचार करून प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अन्यथा नागरिकांचा रोष प्रचंड वाढेल आणि त्याची सर्व जबाबदारी महापालिकेवर असेल, असा इशाराही त्यांनी दिला.

# श्रुती संगीत निकेतन संस्थेच्यावतीने १३ जुलैला नादसरिता पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन





नगर – श्रुती संगीत निकेतन या संस्थेच्या वतीने डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर आणि कीर्तीदेवी खरवंडीकर यांच्या पुण्यस्मृती निमित्त नादसरिता या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. संगीत क्षेत्रात कार्य करणाऱ्या दाम्पत्याला या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.

यावर्षी हा पुरस्कार पुणे येथील ओंकार खाडिलकर आणि सौ. प्राजक्ता खाडिलकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम १३ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता रावसाहेब पटवर्धन सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. सदर पुरस्कार अहिल्यानगर येथील साहित्यिक डॉ.अनिल सहस्रबुद्धे आणि सौ.उषा सहस्रबुद्धे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. पुणे येथील ओंकार खाडिलकर हे शास्त्रीय गायन, तसेच संगीत नाटक क्षेत्रात आणि प्राजक्ता खाडिलकर या कथ्थक नृत्य क्षेत्रात कार्य करत आहेत. या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या प्रसंगी ओंकार खाडिलकर यांची शास्त्रीय, नाट्य आणि सुगम गायनाची तसेच प्राजक्ता खाडिलकर यांची कथ्थक नृत्याची समर्पण ही मैफल आयोजित करण्यात आली आहे. या मैफलीला तबल्यावर हर्षद भावे, हार्मोनियम वर मकरंद खरवंडीकर साथसंगत करणार असून आणि निवेदन डॉ.हृषिकेश कुलकर्णी करणार आहेत. पुरस्कार वितरण सोहळ्याचे सूत्रसंचालन सौ. स्नेहल उपाध्ये करतील. या प्रसंगी विविध संगीत परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रम विनामूल्य असून सर्व रसिक, गुरुजन आणि विद्यार्थी यांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्षा डॉ. धनश्री खरवंडीकर यांनी केले आहे.

# बॅकस्टेज आर्टिस्ट असोसिएशनतर्फे १९ व २० जुलैला कथाकथन आणि सुगम संगीत स्पर्धांचे आयोजन





स्व.शामसुंदर बिहाणी बंगडीवाला

नगर – अहिल्यानगर बॅकस्टेज आर्टिस्ट असोसिएशनतर्फे १९ व २० जुलै रोजी राज्यस्तरीय आंतरशालेय कथाकथन स्पर्धा आणि राज्यस्तरीय आंतरशालेय सुगम संगीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कथाकथन स्पर्धेचे हे सलग २२ वे वर्ष असून, सुगम संगीत स्पर्धा यंदा प्रथमच घेण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष सिनेनाट्य अभिनेते मिलिंद शिंदे यांनी दिली.

स्व. श्यामसुंदरजी बिहाणी बंगडीवाला स्मृती कथाकथन स्पर्धा १९ जुलै रोजी भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल येथे दोन गटात होणार आहे. इयत्ता पाचवी ते सातवी या लहान गटाकरिता सादरीकरणाची वेळ सात मिनिटे असून आठवी ते दहावी या मोठ्या गटासाठीची वेळ दहा मिनिटे आहे. दोन्ही गटात मिळून सांघिक विजेतेपदाचा फिरता करंडक शाळेस देण्यात येईल, अशी माहिती कामोद खराडे यांनी दिली.

स्व.मनिष कुलकर्णी स्मृती राज्यस्तरीय आंतरशालेय सुगम संगीत स्पर्धा २० जुलै रोजी सावेडीच्या रावसाहेब पटवर्धन स्मारक सभागृह येथे होणार आहे. या स्पर्धेत ५ वी ते १० वीचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. सहभगी शाळेचे जास्तीत जास्त चार विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. सादरीकरणाची वेळ कमाल पाच मिनिटे असून आयोजकांच्या वतीने तबला व संवादिनी वादक उपलब्ध करून दिले जाणार आहेत, अशी माहिती प्राची कुलकर्णी यांनी दिली.

बॅकस्टेज आर्टिस्ट असोसिएशनच्या या दोन्ही स्पर्धेतील विजेत्यांना भरघोस पारितोषिक देण्यात येणार आहेत. या दोन्ही स्पर्धेच्या प्रवेशिका जुना मंगळवार बाजार येथील यज्ञ मेडिकल व पाईपलाईन रोडवरील अमृतेश्वर किराणा स्टोअर्स येथे उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी ९४२२२२३३१७, ९८२३३८५१५६ व ९८२२२०८६४८ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन विक्रांत मनवेलीकर व संतोष बडे यांनी केले आहे.

# श्री प्रविणऋषीजी महाराजांच्या मंगल सानिध्यात पुणे येथे होणार १८ ते २५ जुलै दरम्यान आनंद जन्मोत्सव, २१०० अठ्ठाई महोत्सव



नगर – राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी महाराजांचे सुशिष्य अर्हम विज्ञा प्रणेता श्री प्रविणऋषीजी महाराजांच्या मंगल सानिध्यात १८ ते २५ जुलै दरम्यान आचार्य आनंदऋषिजी महाराजांच्या १२६ जन्मोत्सव निमित्त भव्य दिव्य २१०० अठ्ठाई महोत्सव पुणे येथे साजरा होत आहे. पुण्याच्या पुण्यभुमीत होत असलेल्या अद्वितीय १२६ व्या आनंद जन्मोत्सवात नवकार मंत्र सामुहिक जाप आदी अनुष्ठान कार्यक्रमाबरोबर २१०० तपस्वीकडुन अठ्ठाई तप करविण्याचा संकल्प उपाध्यायश्रीनी घेतला आहे. जेथे जेथे धर्म प्रसारात त्यांची मंगल पदयात्रा चालू आहे, तेथे अठ्ठाई करण्यासाठी गुरुभक्तना प्रेरित करीत आहे. संभाजीनगर येथील ऐतिहासिक चातुर्मास संपन्न करून उपाध्यायश्रींचे चातुर्मासनिमित्त आगमन झाले आहे. जळगांव, शिर्डी, चिचोंडी, अहिल्यानगर अशा अनेक स्थानांना पदस्पर्श, धर्मप्रभावना करीत लाखो गुरुभक्तांना प्रभावी वाणीने मार्गदर्शन करीत पुणे शहरात प्रवेश केला आहे.

६ जुलै रोजी उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा., श्री तीर्थशऋषीजी म. सा. आदी ठाणा, दक्षिण ज्योति आदर्श ज्योतिजी म.सा. आदि ठाणा ३ जिनशासन गौरव सुनंदाजी म.सा. आदि ठाणा ६ चातुर्मासस्थानी प्रवेश केला. उपाध्याय श्रीजींच्या मंगल प्रवेश प्रसंगी अथांग जनसागर उसळला होता. ६ जुलै रोजी सकाळी श्री शत्रुंजय मंदिरात १०१८ जोडप्यांनी भक्तामर स्तोत्रांचे सामूहिक पठण करून प्रवेश यात्रेची मुहूर्तमेढ केली. त्यानंतर श्री शत्रुंजय मंदिरातून निघालेल्या शोभायात्रेत पारंपरिक पोषाख, भजन मंडळे, घोष वाहने, आकर्षक देखावे आणि कलश यात्रा यांचा समावेश होता, ज्यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. तरुणाईच्या उत्साहाने यात अधिक चैतन्य भरले. देश–विदेशातून आलेल्या दहा हजारहुन ही जास्त गुरुभक्तांची श्रद्धा, भक्ती आणि आस्थेची प्रचिती या मंगल प्रवेशावेळी सर्वांना आली.

चातुर्मास अत्यंत उत्साहात करण्यासाठी पुणे सकल जैन समाजाची जय्यत पुर्वतयारी सुरु आहे. पहिल्या भव्य कार्यक्रमाची–२१०० आनंद अठ्ठाई तप महोत्सवाची घोषणा करण्यात आलेली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही अतिशय उत्साहात व जास्त भव्य प्रमाणात हा सोहळा होणार आहे. या सोहळ्यात भाग घेण्यासाठी देशभरातून गुरुभक्त येतात. या आनंद जन्मोत्सवात तपोत्सवात दरवर्षी १२५ पेक्षा जास्त अजैन बांधवही भाग घेउन तपस्या करतात


हा सोहळा म्हणजे तप –साधना –भक्ति आराधना यांचा संगमच असतो. या अठ्ठाई तपाचे वैशिष्ट्य म्हणजे साधना आणि आराधने बरोबर आचार्य आनंद गुरु भगवंताच्या अस्तित्वाच्या अनुभूतित त्यांच्या भक्तित रममान होवून तपस्या केल्याने आनंद उत्साहात तपस्या पूर्ण होते त्यामुळेच ज्यांनी कधी यापूर्वी तपस्या करण्याचा विचार ही केला नाही किंवा छोटे–मोठे आजार असणारे सुद्धा हर्ष उल्हासाने तपस्या पूर्ण करताना दिसतात आणि या तपस्येची सहज तेने पूर्णाहुती गुरुकृपेंने करतात. त्यांचा २१०० तपस्वीं बरोबर तप पचकान घेताना आनंद द्विगुणीत होतो.

गुरुदेवांचे आवाहन आहे की, तुम्ही तपस्या सुरु केल्यावर कुठल्याही क्षणी तुम्हाला अस्वस्थता वाटली तर तुम्ही गुरुदेवांशी संपर्क करून समाधान घेऊ शकता तर अशा या अद्भूत तपस्येची अनुभूती घ्यायची असेल तर नक्कीच उपाध्यायश्रींच्या चरणी पोहोचावे लागेल. जे गुरुदेवांच्या सानिध्यात राहुन आठ दिवसांची तपस्या करू इच्छितात, त्यांना राहण्याची व्यवस्था उपलब्ध आहे.

दरवर्षी अहिल्यानगर जिल्हयातूनही शेकडो भाविक तपस्वी या सोहळ्यात अठ्ठाई तपाची भेट समर्पित करण्यासाठी जात असतात. यावर्षीही सर्व भाविक तपस्वींनी या तपोत्सवात भाग घ्यावा, अशी विनंती आनंदतीर्थ, अर्हम विज्ञा परिवारातर्फ करण्यात येत आहे. या तपाची धारणा १७ जुलै रोजी गुरुदेवांच्या सानिध्यात व मार्गदर्शनात पुणे येथे होत आहे. १८ जुलैपासून या तपोत्सवाची सुरवात व २५ जुलै रोजी २१०० तपस्वींची तप–पचकावनी होणार आहे.

या तपस्यानिमित्त ध्यान–साधना–आराधनाचे मार्गदर्शन १७ जुलैला गुरुदेवांद्वारे (ऑनलाइन उपलब्ध) केले जाईल. या तपोत्सवात भाग घेण्यास इच्छुक भाविकांनी खालील नंबरवर संपर्क करून नावनोंदणी करावी. ९४०३७३४२६८, ९९२१६२९५५०, ८७८८७९३०८३, ९२२५१९०००८, ९९२१४०४१३१.

# गुरुवारी वारी गुरु बाबाजींची ... वारी देवगडची !



गुरुविण न मिले ज्ञान, ज्ञानाविन होईना उदधार,
म्हणुनी वंदू गुरुचरणा, जेणे उजळे जीवन ।
**श्री दत्तगुरु पीठ श्री क्षेत्र देवगड मठाधिपती महंत**
**प.पु.भास्करगिरी महाराज नम :**
गुरुशिवाय ज्ञान मिळत नाही,
ज्ञानाशिवाय उद्धार होत नाही,
म्हणून ज्या गुरुंनी जीवन उजळले,
त्यांच्या चरणी मी नतमस्तक आहे !

गुरु पोर्णिमा निमित्ताने माझे गुरु प.पु.भास्करगिरी महाराज – बाबाजी यांच्या बद्दल असलेले प्रेम, आदरभाव, भक्ती व कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता अल्पसा केलेला हा प्रयत्न होय.

अहिल्यानगर जिल्हा हे संतांची भूमी म्हणुन ओळखले जाते. तसेच या जिल्हाला ऐतिहासिक वारसा देखील मोठ्या प्रमाणात लाभलेला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात शिर्डीचे साई बाबा मंदिर, सिद्धटेक येथे अष्टविनायक पैकी एक श्री सिद्धीविनायक मंदिर, पाथर्डी तालुक्यातील श्री वृद्धेश्वर मंदिर, श्री नवनाथांपैकी एक ओम चैतन्य कानिफनाथ महाराज यांची संजीवन समाधी श्री क्षेत्र मढी येथे आहे. मोहटा येथील जगदंबा देवीचे मंदिर, रतनवाडी येथील श्री भगवान शंकराचे देवस्थान पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर लेणी, कायगाव टोका येथील श्री सिद्धेश्वर मंदिर, जगाच्या नकाशावर प्रसिद्ध पावलेले श्री क्षेत्र शनि शिंगणापूर, संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊली यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली पावन नेवासा नगरी व याच नेवासा नगरीत संत श्री ज्ञानेश्वर माऊली यांनी पवित्र असा ज्ञानेश्वरी ग्रंथ ज्या खांबाला टेकून लिहिला असे पैस खांब मंदिर प्रसिद्ध मोहिनीराज मंदिर नेवासे व याच नेवासा नागरी पासून जवळच अवघ्या १३ किमी. अंतरावर व अहिल्यानगर पासून ६६ किमी अंतरावर संभाजीनगर महामार्गावर अमृतवाहिनी प्रवरा नदीच्या तीरावर वसलेले श्री क्षेत्र देवगड म्हणजे या भूतलावरील जणू काही स्वर्गच !

माझे परम मित्र श्री संजय सावंत हे बाबाजींचे खास भक्त होय. ३० ते ३२ वर्षांपासून बाबाजींचा सहवास व आशीर्वाद लाभलेले माझे परम स्नेही आहेत. या गुरुपौर्णिमाला एक वर्ष पूर्ण होईल म्हणुन या प्रसंगाची मला प्रकर्षाने जाणीव झाली. मी त्यांना गुरुपौर्णिमेच्या आदल्या दिवशी फोन केला आणि म्हणालो आपल्याला देवगडला बाबाजींच्या दर्शनाला जायचे आहे. त्यांनी होकार दर्शविला व आम्ही दोघे देवगडला दर्शनाला गेलो. तेव्हापासून त्यांच्या समवेत दर गुरुवारी देवगड वारी अखंडित करण्याचा योग आला हे मी माझे परम भाग्य समजतो. तेव्हापासून आजतागायतच्या वर्षभरात एक अनेक अनुभुती मला माझ्या जीवनात अनुभवायला मिळाल्या यामागे खूप मोठी शक्ती, भक्ती व ताकत आणि बाबाजींचे आशीर्वादच आहेत असे म्हणावे लागेल. आपल्या हातून काही चांगले कर्म घडायचे असतील तर भगवंत कुणाला न कुणाला मध्यस्थी दूत म्हणुन पाठवतो हीच प्रचीती आहे.

माझे गुरु सदगुरु परमपूज्य महंत श्री भास्करगिरी महाराज हे सर्व भक्तांना व आपल्या शिष्यांना आपल्या अमृतवाणीतून अत्यंत मौलिक ज्ञान, मार्गदर्शन करतात. दर गुरुवारी, एकादशीला, गुरुपौर्णिमेला, प.पूज्य बाल संन्यासी श्री किसनगिरीजी महाराज यांच्या पुण्यतिथीला, श्री गुरुदत्त जयंतीला, महाशिवरात्रीला अलोट भाविकांची गर्दी श्री क्षेत्र देवगड येथे आपणास पाहायला मिळते.

परमपूज्य श्री भास्करगिरी महाराज यांचे प्रसन्न मुद्रा बघून दर्शनाने आत्मिक सुख, शांती, समाधान, आनंद प्राप्त होतो. त्यांच्या आशीर्वादाने भक्तांच्या जीवनातील अडीअडचणी समस्यांचे, दुःखांचे निवारण होते आणि पुन्हा श्री गुरुजींचे दर्शन कधी होईल याची आस मनाला लागते. कीर्तनाच्या, प्रवचनाच्या माध्यमातून परमपूज्य भास्करगिरी महाराज व उत्तराधिकारी श्री स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या सुमधुर वाणीने व आशीर्वादाने भाविक मंत्रमुग्ध होऊन जातात व आपल्या जीवनाचा आनंद, सुख, शांती, समाधान प्राप्त करतात.

बालब्रह्मचारी परमपूज्य भास्करगिरी महाराज यांचे देवगड येथील निस्वार्थ सेवेला पन्नास वर्षे पूर्ण होऊन गेलेले आहेत. श्री क्षेत्र देवगड या धार्मिक क्षेत्राच्या विकासामध्ये परमपूज्य भास्करगिरी महाराज यांचा मोलाचा वाटा आहे. अतिशय शांत, निर्मळ, स्वच्छ परिसर, निसर्गरम्य, पवित्र व पावन तीर्थक्षेत्र या भूतलावरील जणूकाही स्वर्गच ! श्रीक्षेत्र देवगड या तीर्थक्षेत्राचे नावलौकिक संपूर्ण महाराष्ट्रात व भारत देशात नावारूपाला आलेले आहे. संपूर्ण देवगड मंदिराची वास्तू अत्यंत देखणी असून प्रामुख्याने श्री दत्त मंदिर संपूर्ण बांधकाम हे संगमरवर असून मंदिरावर ४ फूट उंचीचा सोन्याचा कळस आहे. येथील वातावरण हे अतिशय मंगलमय व पवित्र असून येथे दर्शनाला आल्यावर मनस्वी आनंद व सुख शांती प्राप्त होते. या मंदिराच्या परिसरात श्री शनी महाराज, श्री मारुती, ओम चैतन्य श्री मच्छिंद्रनाथ, ओम चैतन्यश्री गोरक्षनाथ, श्री मार्कंडेय स्वामी, श्री सिद्धेश्वर, श्री माता पार्वती, श्री गणेश व श्री कार्तिक स्वामी व श्री दत्त मंदिर आहे. तसेच भुयारामध्ये तपस्वी बाल ब्रह्मचारी प.पूज्यनीय श्री किसनगिरी महाराज यांची समाधी स्थान आहे. मंदिराच्या मागील बाजूला अमृतवाहिनी प्रवरा नदी वाहते व या नदीवरच भक्कम असा घाट बांधण्यात आलेला असून नौकानयनाची व्यवस्था उपलब्ध आहे.

**अविस्मरणीय मंगलमय प्रसंग** – प. पूज्य भास्करगिरीजी महाराज – बाबाजी २२ जून ला पंढरपूरला श्री पांडुरंगाच्या दर्शनासाठी गेले होतेव द्वादशीच्या दिवशी म्हणजे २३ जून रोजी बाबाजी भिस्तबाग येथील किसनगिरी नगरी मध्ये प्रति देवगड म्हणुन प्रसिद्ध असलेले श्री दत्तधाम येथे दुपारी ३:३० च्या दरम्यान अचानक पाहोचले व पंढरपूर मधून येताना पांडुरंगाला भोग चढवलेला लाडूचा प्रसाद घेऊन आले. ही वार्ता समजताच पटापट १०० ते १५० भाविक बाबाजींच्या दर्शनाला जमा झाले. सर्वांनी बाबाजींचे दर्शन घेतलले. बाबाजींनी अतिशय आत्मीयतेने व प्रेमाने सर्व भाविकांची व शिष्यांची विचारपूस केली. पांडुरंगाच्या चरणी द्वादशीच्या दिवशी भोग चढवलेला लाडूचा प्रसाद बाबाजींच्या हस्ते भक्तांना मिळणे म्हणजे अहो भाग्यमच नव्हे का ? आपल्या भक्तांप्रति, शिष्यांन प्रति असलेले प्रेम, दया, करुणा, आत्मीयता ही बाबांच्या ठाई आपणास दिसून येते व हा प्रसंग बघून मन गहिवरून येते. जसे आई आपल्या मुलांना सोडून गावाला जाते व येताना आपल्या मुलांकरीता प्रेमापोटी आवडीचा खाऊ आणते. अगदी तसेच बाबाजी आपल्या भक्तांप्रती हा महाप्रसाद आणला आणि अहो आश्चर्यमच म्हणावे असे घडले. एक लाडूचा प्रसाद १०० ते १५० भाविकांन पर्यंत बाबाजीच्या शुभ हस्ते वाटण्यात आला.

दर गुरुवारी नियमितवारी असताना एक प्रकारची ताकत, ऊर्जा, आनंद, उत्साह प्राप्त होतो. प्रवासात मनाला आल्हाददायक व प्रेरणादेणारे विचार आपसुकच मन: पटलावर उमटतात व ६५ ते ७० किमीचा प्रवास अहिल्यानगर पासून ते देवगड पर्यत एक ते सव्वा तासात भर्कन कसा निघून जातो ते कळतही नाही. मनालाही श्रीगुरुचे दर्शनाची आस लागलेली असते. श्री क्षेत्र देवगड येथील पवित्र पावन भूमीत पाऊल ठेवल्यावर मनाला अलौकिक आरोग्य, सुख, शांती व समाधान प्राप्त होते व मनस्वी आनंद होतो. जेव्हा श्रीगुरू भास्करगिरी महाराज यांचे पवित्र दर्शन होते, तेव्हा मनाला खूप मोठ्या प्रमाणात ऊर्जा मिळते. महाराजांनी आत्मीयतेने केलेले विचारपूस दर्शन झालं का ? असे विचारून केलेले स्मित हास्य हृदयावरती आपुलकी, आत्मीयता, प्रेम, दया व आशीर्वाद याचे पडसाद उमटल्याशिवाय राहत नाही. अशा वेळी भाविक बाबांच्या प्रति असलेले भक्ती रसात चिंब होऊन आशीर्वादाने भरभरून भारावल्याशिवाय राहत नाहीत. अशाच वेळेत आज आपण खूप काही अलौकिक आशीर्वाद प्राप्त केल्याचा सुखद धक्का मनाला जाणवतो व अलौकिक सुख, शांती व आनंद प्राप्त होते.

आजच्या श्री गुरुपौर्णिमेच्या पावन व पवित्र दिवशी हृदयाच्या कान्या – कोपऱ्यात दडलेले श्री गुरूंच्या प्रतीअसलेली भक्ती भावना, प्रेम व आदर या लेखाच्या माध्यमातून पुज्यनीय श्री गुरूंच्या चरणी समर्पित करतो. ।। श्री गुरुदेव दत्त ।।

– **दत्तात्रय वारकड,** अहिल्यानगर

# राज्यस्तरीय बालरोग अधिवेशनात डॉ. सुचित तांबोळी यांचे मार्गदर्शन



नगर – नुकत्याच डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे येथे पार पडलेल्या राज्य पातळीवरील बालरोगतज्ञांच्या अधिवेशनात डॉ. सुचित तांबोळी यांना मॉडरेटर म्हणून पाचारण करण्यात आले. पौगंडावस्थेतील मुलांच्या भावनिक विकासासाठी बालरोगतज्ञांना प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या अधिवेशनात, त्यांनी भावनांक (Emotional Quotient-EQ) वाढवण्याच्या गरजेवर आणि त्याच्या उपयोगितेवर मार्गदर्शन केले.

डॉ. तांबोळी यांनी सांगितले की, भावनांक कोणत्याही वयात वाढवता येतो. त्यांनी 'भावनिक प्रशिक्षण' आणि 'भावनिक लसीकरण' यासारख्या संकल्पनांची माहिती दिली. लहान वयात मुलांमध्ये भावना ओळखण्याची आणि व्यक्त करण्याची क्षमता विकसित करणं आवश्यक आहे. जन्मल्यानंतरच्या पहिल्या सहा महिन्यांपासून बारा वर्षांपर्यंत विविध टप्प्यांवर भावनिक लसीकरण गरजेचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

अधिवेशनात त्यांनी समजावून सांगितले की, भावना आणि विचार परस्परावलंबी असतात. भावना केवळ आनंददायक किंवा दुःखदायक नसून त्या राग, भीती, प्रेम, असूया, उत्साह अशा विविध प्रकारच्या असतात. या भावना न्युरोपेप्टाइड्सच्या स्वरूपात शरीरात अस्तित्वात असतात आणि आपल्या वर्तनावर आणि निर्णय क्षमतेवर प्रभाव टाकतात.

भावनांचे योग्य प्रशिक्षण लवकर सुरू केल्यास त्यातून होणारे अतिरेकी प्रतिक्रिया आणि मानसिक आरोग्याशी संबंधित त्रास टाळता येऊ शकतात. नगर येथील अलीकडील शालेय घटनेचा संदर्भ देत त्यांनी याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यामुळे, शालेय अभ्यासक्रमात भावनिक शिक्षणाचा समावेश होणे काळाची गरज असल्याचे ते म्हणाले.

डॉ. तांबोळी यांनी मेंदूमधील भावनिक प्रक्रिया, प्रेम, अहंकार, निर्णयक्षमता आणि भावनिक नियंत्रण यामागील मेंदूच्या कार्यप्रणालीचे शास्त्रीय स्पष्टीकरण दिले. बुद्ध्यांक सहा वर्षांनंतर स्थिर होतो, मात्र भावनांक कोणत्याही वयात वाढवता येतो हे त्यांनी अधोरेखित केले.

या परिसंवादात पुण्याचे डॉ. आनंद देशपांडे आणि डॉ. गीता करंबेळकर तसेच मुंबई येथील डॉ. सौ. अमोघ शहाणे आणि डॉ. सौ. कल्याणी पात्रा यांनी सहभाग घेतला. संपूर्ण महाराष्ट्रातून ४०० हून अधिक बालरोगतज्ञांनी या अधिवेशनात सक्रिय सहभाग नोंदवला.

# महामौनाची शंभर वर्षे

## (१० जुलै 'मौन दिवस'च्या निमित्ताने

झोपलेल्या मनुष्याला जागे करणे एकवेळ सोपे आहे; परंतु झोपेचे सोंग घेणाऱ्या मनुष्याला जागे करणे म्हणजे महाकठीण! जो हिताच्या चार गोष्टी ऐकून घेऊन त्यावर अंमल करतो, त्याला काही सांगण्यात अर्थ आहे. परंतु जो अशा गोष्टी एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देतो, त्याला काही सांगण्यात काय अर्थ आहे? नेमक्या याच कारणासाठी चिरंतन दैवी प्रियतम अवतार मेहेरबाबा यांनी महामौन धारण केलेले आहे. ईश्वराचे पूर्ण अवतार असल्याने ते अमर आहेत व भौतिक देहाच्या मृत्यूनंतरही त्यांचे महामौन आजही सुरू आहे व यापुढेही निरंतर सुरुच राहील.



१० जुलै १९२५ रोजी लोअर मेहेराबाद येथील आपल्या झोपडीत प्रियतम बाबांनी आपल्या महामौनास प्रारंभ केला. त्यावेळी त्यांच्या एका शिष्याने त्यांना विचारले की, ''आपण जर मौन धारण केले, तर आम्हाला कोण शिकवणार?'' त्यावर बाबांनी स्पष्ट केले की, ''मी शिकविण्याकरीता आलो नाही मी आत्मजागृती करण्यासाठी या जगात आलो आहे.'' आपल्या मौनाच्या सुरुवातीला काही काळ बाबा पाटी व पेन्सिलच्या साहाय्याने संवाद साधत. नंतर ते संवाद साधण्यासाठी वर्णाक्षर फलकावर वेगाने फिरत असत व त्यांच्या सोबत असणारा शिरूय ते पाहून त्या अनुसार बोलत असे. साधारणपणे १९५४ च्या सुमारास बाबांनी तो फलक बाजुला ठेवून दिला व त्यानंतर ते आपल्या हातांच्या विशिष्ट खुणांद्वारे संवाद साधत असत. एकदा आपल्या मौनाच्या बद्दल बाबांनी सांगितले की, ''एखादा विचार अथवा भाव व्यक्त करण्यासाठी लोक बोलत असतात परंतु, मला मात्र त्यासाठी शब्द या माध्यमाची आवश्यकता वाटत नाही. यथार्थ गोष्टी या नेहमी मौनाच्या माध्यमातूनच दिल्या व घेतल्या जातात.'' एकदा उद्विग्नतेच्या भरात बाबांनी स्पष्ट केले की, ''माझे मौन जर बोलत नसेल, तर मग माझ्या बडबडीचा तरी काय उपयोग?'' या विधानावरुन त्यांचे मौन त्यांच्या नाराजीचे प्रतीक आहे, असे म्हणायला वाव आहे.

प्रियतम बाबांच्या जीवनातील उल्लेखनीय अशा गोष्टी पैकी एक म्हणजे, 'मस्त' सेवेचे पर्व! 'मस्त' म्हणजे ईश्वराच्या प्रेमात आकंठ बुडालेले उन्नत असे जीव. या मसतांची चेतना ही आपल्या पेक्षा वरच्या पातळीवर असते व त्यामुळे त्यांना सभोवतीच्या जगाचे फारसे भान नसते. त्यामुळे ते कित्येकदा उकीरड्या सारख्या अथवा घाणेरड्या जागी सुद्धा दीर्घकाळ राहतात. काही मस्त तर अनेक वर्षे आंघोळ देखील करत नाही. वरवर पाहता ते वेडे असल्यासारखे भासतात परंतु, उन्नत आत्मे असल्याने त्यांच्या ठायी दैवी शक्ती जागृत असतात. सामान्य मनुष्य वेडा आणि मस्त या दोघांतील फरक ओळखू शकत नाही. परंतु अवतार अथवा एखादा सद्गुरू मस्तांना पाहता क्षणीच ओळखतात. प्रियतम बाबांनी संपूर्ण भारतातील तसेच परदेशातीलही काही मस्तांना, ज्यांची संख्या शेकडोंच्या घरात आहे, शोधून काढले. त्यांना आंघोळी घातल्या, त्यांच्यवर औषधोपचार केले, त्यांना अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टी दिल्या. त्यांच्यासाठी अनेक ठिकाणी आश्रम स्थापन केले. प्रियतम बाबांनी शेकडो कुष्ठरोग्यांची सुद्धा मस्तांप्रेमाणेच सेवा केलेली आहे. बाबांनी हजारो साधुंची देखील सेवा केलेली आहे. मस्त, कुष्ठरोगी आणि साधु म्हणजे बाबांची लाडकी लेकरे! ज्यांना सर्व जगाने नाकारलेले आहे, त्यांना एका ईश्वराशिवाय इतर कोणाचा आधार असणार बरे!

प्रियतम बाबांनी ईश्वर प्राप्ती करीता ज्ञान, ध्यान (ईश्वराच्या निराकार स्वरुपाचे), ईश्वर प्रेम व पवित्र जीवन असा हजारो वर्षांपासून चालत आलेला तिन्ही काळांमध्ये अतिशय उपयुक्त, सिद्ध झालेला, सोपा असा मार्ग सांगितलेला आहे. पवित्र जीवनाचे सुद्धा फार महत्त्व आहे. कारण, चेतनेचे सुंदर फुलपाखरू केवळ संयमाच्या पंखांनीच जाणीवेच्या सातव्या आकाशात उडविणे शक्य आहे. 'पवित्र जीवन' म्हणजे आत्मासाक्षात्कार हे जीवनाचे सर्वोच्च ध्येय मानून, इतरांवर कसलाही अन्याय होणार नाही, याची दक्षता घेत संयमाने व अहिंसेने जगले जाणारे साधनामय असे जीवन!


सर्वांना प्रियतम बाबांच्या महामौनाच्या शताब्दीच्या निमित्ताने हार्दिक शुभेच्छा! जय बाबा!

– **ऋषीकेश गोडसे,** अ.नगर
संदर्भ – 'मेहेर प्रभू'
कॉपी राईटस् – अवतार मेहेरबाबा प.प.चॅ.ट्रस्ट, अ.नगर

# अपमानातून चार कोटींची देणगी !

मुलीने वारसा हक्कावरून केलेला अपमान सहन न झाल्याने लष्करातून निवृत्त झालेले जवान एस विजयन यांनी त्यांची चार कोटी रुपयांची संपत्ती एका मंदिराला दान केल्याची घटना समोर आली आहे. ही घटना तामिळनाडूच्या तिरुवन्नामलाई जिल्ह्यातील आहे. या जिल्ह्यातील अरुलमिगु रेनुगांबल अस्मान मंदिराला त्यांनी ही देणगी दिली आहे.

मुलीने वर्षानुवर्षे दुर्लक्ष केल्यामुळे आणि दुखावल्यामुळे आपण हा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. याआधी त्यांचे मुलीसोबत वारसा हक्कावरून अनेकदा वाददेखील झाले होते. मात्र वडिलांनी रागाच्या भरात ही संपत्ती मंदिराला दान केली. त्यानंतर आता कुटुंबीयांनी ही संपत्ती परत मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. निवृत्त लष्करी जवान विजयन हे अराणी शहराजवळ असणाऱ्या केशवपुरम या गावातील रहिवासी आहेत. ते त्यांच्या दोन मालमत्तांची कागदपत्रे घेऊन मंदिरात गेले होते. यामध्ये मंदिराजवळ असणारी एक मालमत्ता



तीन कोटींची असून दुसरी मालमत्ता एक कोटी रुपयांची आहे. मंदिरातील कर्मचाऱ्यांनी २४ जून रोजी दानपेटी उघडली असता त्यांना या दानपेटीत ४ कोटी रुपये किंमतीच्या मालमत्तेची मूळ कागदपत्रे मिळाली.


मंदिर प्रशासनाच्या अधिकाऱ्यांने सांगितले, की दर दोन महिन्यांनी आम्ही दानपेटी उघडून भाविकांनी दिलेले दान मोजतो. ही आमची नियमित परंपरा आहे. मंदिरात एकूण ११ दानपेट्या आहेत. अशाच एका मोजणीवेळी त्यांनी मंदिराच्या समोरच्या बाजूला ठेवलेली दानपेटी उघडली असता त्यांना त्यात नाणे आणि नोटांसोबतच मालमत्तेची मूळ कागदपत्रे मिळाली. त्यांना ही कागदपत्रे पाहून धक्का बसला. या कागदपत्रांसोबत एक चिठ्ठीदेखील त्यांना सापडली. त्यात ते स्वच्छेने ही संपत्ती मंदिराला दान करत असल्याचे म्हटले आहे. दरम्यान त्या ठिकाणी अशी घटना घडण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यामुळे मंदिराच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, की अशी कागदपत्रे दानपेटीत टाकून संपत्ती आपोआप मंदिराची होत नाही. दान करायचे असेल तर त्यांनी अधिकृतपणे विभागाकडे नोंदणी करावी.

## कॅलिडोस्कोप

# नशीबवान आई-वडील

मुलांना प्रगती करताना पाहण्याचा आनंद हा पालकांसाठी सर्वात मोठा असतो. प्रत्येक पालकांना त्यांचा मुलगा किंवा मुलगी आयुष्यात त्यांच्यापेक्षा मोठे नाव आणि स्थान मिळवते तेव्हा सार्वधिक आनंद होत असतो. असाच एक प्रसंग इंडिगो विमानात घडला. एक एअर होस्टेस मुख्य केबिन क्रू म्हणून विमानात नियुक्तीला असताना तिचे पालक या विमानात चढले. त्यावर तिची कृती भारावून टाकणारी आहे. तिच्या पालकांना पाहून एअर होस्टेस भावूक झाली.

विमानातील या दृश्यातून या मुलीचे तिच्या पालकांबद्दलचे प्रेम आणि आदर दिसून येतो. मुलीची प्रगती पाहून पालकांच्या डोळ्यात आनंद दिसून येतो. एअर होस्टेस फ्लाइटमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रवाशांचे स्वागत करत असते. त्याच वेळी एअर होस्टेसची आई विमानात प्रवेश करते. आईला पाहून एअर होस्टेस आनंदी होते आणि तिच्या पाया पडते. त्यानंतर दोन्ही हात आई तिच्या डोक्यावर ठेवते. त्यानंतर तिचे वडील फ्लाइटमध्ये



चढतात. एअर होस्टेस त्यांच्याही पाया पडते. फ्लाइटमध्ये एअर होस्टेसच्या ड्रेसमध्ये आपल्या मुलीला पाहून दोन्ही पालक भावुक होतात.




# इथल्या रस्त्यांना नावंच नाहीत!

शहर असो किंवा गाव, प्रत्येक चौकाला, रस्त्याला वेगवेगळी नावं दिली जातात. भारतासारख्या देशात तर नावांवरून सतत वाद सुरू असतो. राजकारणी, स्वातंत्र्यसैनिक, विविध क्षेत्रातल्या कर्तबगार व्यक्ती यांची नावं रस्त्यांचा, चौकांना देण्याचा प्रघात आहे. अर्थात अशा नावांशिवाय कोणताही पत्ता पूर्ण होणार नाही. मात्र जर्मनीमधल्या एका ठिकाणच्या रस्त्यांना नावंच नाहीत. जर्मनीमध्ये हिलगर्मिसन नावाचं एक ठिकाण आहे. इथे गेल्यावर पत्ता कसा विचारायचा असा प्रश्न कोणालाही पडेल. इथे रहाणाऱ्या काही नागरिकांना या बिननावांच्या रस्त्यांमुळे बराच त्रास होतो. पत्ता काय सांगायचा असा प्रश्न त्यांना पडतो. याच कारणामुळे २०१९ च्या फेब्रुवारी महिन्यात इथे मतदानाचं आयोजन करण्यात आलं होतं. रस्त्यांना नावं द्यायची किंवा नाही याचा निर्णय मतदानाद्वारे होणार होता. इथल्या लोकांनी रस्त्यांना नाव न देण्याच्या बाजूने मतदान केलं. हिलगर्मिसन हे गाव १९७० च्या दशकात वसवण्यात आलं. इथल्या घरांचे पत्ते फक्त घर क्रमांक आणि गावाचं नाव एवढ्यापुरतेच मर्यादित आहेत. या गावाची लोकसंख्या अवघी २२०० इतकी आहे. मात्र या लोकांना नाव नसण्याची पद्धत पुढे सुरू ठेवायची आहे.

# चार आण्याची कोंबडी, बारा आण्याचा मसाला!

भारतात गाड्यांसाठी व्हीआयपी नंबर प्लेट्सची क्रेझ सवश्रुत आहे. कार किंवा बाईकचे मालक चांगली आणि त्यांना हव्या असलेल्या नंबरची नंबर प्लेट आपल्या गाड्यांना लावतात. त्यासाठी ते कारच्या किंमतीत पाच टक्के जास्त रक्कम खर्च करत असतात. मात्र टू व्हीलरसाठी व्हीआयपी नंबर मिळवण्यासाठी एका व्यक्तीने लाखो रुपये खर्च केल्याचे कधी तुम्ही ऐकले का? हो ते खरे आहे.

हिमाचल प्रदेशमध्ये सोलनच्या संजीव कुमार यांनी त्याच्या बँकेत असलेली एफडी मोडली. त्यांनी नवीन होंडा ॲक्टिव्हा या एक लाख रुपयाच्या स्कूटरसाठी व्हीआयपी नंबर प्लेटवर तब्बल १४ लाख रुपये खर्च केले. संजीव त्यांच्या ॲक्टिव्हाच्या व्हीआयपी नंबरमुळे संपूर्ण परिसरात सगळ्यांमध्ये चर्चेचा विषय ठरले आहेत.


एका व्यक्तीने एक लाख रुपयाची स्कूटर घेतली आणि १४ लाख रुपये हे फक्त व्हीआयपी नंबरसाठी खर्च केले. व्हीआयपी नंबर प्लेट एचपी २१सी–०००१ चे ते मालक आहेत.

नंबर प्लेटचा लिलाव

दरम्यान, त्यांचा मुलगा दिनेश कुमार म्हणतो, वडिलांना पूर्णपणे वेगळा नंबर हवा होता. त्यांनी ही गाडीची खास नंबर प्लेट मिळवण्यासाठी हिमाचल प्रदेशच्या परिवहन विभागाच्या अधिकृत



वेबसाइटवर अर्ज केला आणि लिलाव ठेवण्यात आला. ऑनलाइन लिलावात शेवटी दोन जणांमध्ये स्पर्धा होती. दुसऱ्या व्यक्तीने १३.५ लाख रुपयांची बोली लावली होती; पण कुमार यांनी त्या नंबरसाठी ५०००० रुपये जास्त देऊन ती बोली जिंकली. ही नंबर प्लेट आता देशातील सगळ्यात महागडी नंबर प्लेट बनली आहे.



# सिंहासनावर बसा, भरपूर पैसे कमवा!

रशियाची राजधानी मॉस्कोमध्ये तयार करण्यात आलेलं एक सिंहासन सध्या चर्चेचा विषय ठरलं आहे. हे सिंहासन २.५ इंच बुलेटप्रूफ जॅकेटपासून तयार करण्यात आलं आहे. या सिंहासनाचं मुख्य वैशिष्ट्य म्हणजे काचेच्या आत असणाऱ्या नोटा. या नोटा सुमारे एक लाख डॉलर्स म्हणजे सात कोटी रुपये किंमतीच्या असल्याचं बोललं जात आहे. या सिंहासनावर सर्वसामान्य बसू शकतात. 'एक्स १० मनी थ्रोन' या नावाने हे सिंहासन ओळखलं जाणार आहे. रशियन पॉपस्टार ॲलेक्सी सर्गियेंको आणि उद्योजक इगोर राइबाकोव यांनी हे सिंहासन तयार केलं आहे. आता हे पैशांचं सिंहासन तयार करण्यामागचा नेमका उद्देश काय, असा प्रश्न कोणालाही पडू शकतो. या दोघांनी एका वेगळ्या उद्देशाने हे सिंहासन तयार केलं आहे. या सिंहासनावर बसल्यानंतर लोकांना पैशांचं महत्त्व कळेल आणि जास्तीत जास्त पैसे कम ावण्याची प्रेरणा मिळेल, असं ॲलेक्सी आणि इगोरचं म्हणणं आहे. रशियातले लोक श्रीमंत व्हावेत, असं या दोघांना वाटतं. या सिंहासनावर बसल्यानंतर लोकांनी पैसे कमावण्याचा गांभिर्याने विचार करावा, अशी त्यांची अपेक्षा आहे.

# घोडी पळाली नवऱ्याला घेऊन!

लग्नाच्या हंगामात प्रत्येक वरात काहीतरी वेगळी असते. काही ठिकाणी नवरदेव हेलिकॉप्टरने येतो, तर काही फिल्मी शैलीत नाचतात. एक घटना मात्र थोडी वेगळीच आहे. नवरदेव घोडीवर बसला होता, बँड



वाजत होता, नातेवाइक नाचत होते आणि सर्व काही शाही शैलीत सुरू होते. तथापि नंतर असे काही घडले ज्याचा कोणी विचारही केला नसेल. सगळ्यांचा नाच सुरू असताना एक फटाका मोठ्या आवाजात फुटला आणि घोडी वरासह गर्दी असलेल्या वरातीतून धावत सुटली. यामुळे काही काळ वरातीत गोंधळ उडाला.

लग्नाची मिरवणूक पूर्णपणे शाही शैलीत सजवलेली होती. वर पारंपारिक पोशाखात घोडीवर स्वार होता आणि वऱ्हडी मंडळी बँडच्या तालावर नाचत होते. घोडीदेखील संगीतावर हलकेच नाचत होती. पण नंतर उत्साहात एका खोडकर वऱ्हाडीन मोठा फटाका वाजवला. या मोठ्या आवाजाने घोडी खूप घाबरली आणि वराला घेऊन पळून गेली. घोडीचा वेग इतका होता की काही सेकंदात ती दिसेनाशी झाली. वराला खाली उतरण्याचीही संधी मिळाली नाही. काही लोकांनी धावत तिला पकडण्याचा प्रयत्न केला. पण घोडी फक्त धावत राहिली.

फटाक्यांच्या आवाजाने घोडी पळून गेली ही संपूर्ण घटना कोणीतरी मोबाईल कॅमेऱ्यात कैद केली. नंतर वर तिच्या पाठीवरून खाली पडला. घोडी मात्र हाती लागली नाही.

# जॉयनिंगच्या दिवशीच सोडली नोकरी!

कोणी नोकरीच्या शोधात असतो तेव्हा नोकरी मिळणे ही त्याच्यासाठी मोठी गोष्ट असते. पण नोकरीवर रुजू झाल्यावर आणि काम सुरू केल्यावर बरेचदा अनेक लोक निराश होतात. काम त्यांच्या अपेक्षेप्रमाणे नसते किंवा त्यांना ते काम आवडत नाही. बरेचदा लोक त्यांच्या इच्छा दाबून पगारासाठी नोकरी करत राहतात. तर काही लोक अशा परिस्थितीतून पुढे जातात आणि नोकरीचा राजीनामा देतात. पण लोक त्यासाठी थोडा वेळ घेतात, पण एका कर्मचाऱ्याने जॉइनिंगच्या दिवशीच नोकरी सोडली आहे.

नोकरी सोडल्यानंतर, या कर्मचाऱ्याने कंपनीच्या 'एचआर'शी संवाद साधला. तो आता 'सोशल मीडिया'वर व्हायरल होत आहे. कोणीही पहिल्या दिवशी नोकरीवर जातो तेव्हा पहिला दिवस फक्त कामाबद्दल जाणून घेण्यातच जातो. दोन–तीन दिवसांत एखाद्याला त्याचे काम व्यवस्थित समजते. पण 'सोशल मीडिया'वर व्हायरल होणारी बाब ही त्यापेक्षा वेगळीच आहे. येथे एका कर्मचाऱ्याने जॉइनिंगच्या दिवशी नोकरीचा राजीनामा दिला आहे. यानंतर, कंपनीच्या एचआरने त्या कर्मचाऱ्याशी बोलून नोकरीच्या पहिल्याच दिवशी राजीनामा देण्याचे कारण जाणून घेतले.

कर्मचारी आणि 'एचआर'मधील संभाषणाचा स्क्रीनशॉट 'सोशल मीडिया'वर व्हायरल होत आहे. त्यात कर्मचारी म्हणतो, की मी आता पुढे जाऊ शकत नाही. मग 'एचआर' याचे कारण विचारतो. उत्तरात कर्मचारी म्हणतो, 'मला हे काम माझ्यासाठी योग्य वाटले नाही.' मग एचआर विचारतो 'काय योग्य वाटले नाही, ते मला सांगाल का?' कर्मचारी म्हणतो, की कोणतेही काम एका दिवसात परिपूर्ण होत नाही. यानंतर 'एचआर' त्या कर्मचाऱ्याला सांगतो, 'तुम्हाला एका दिवसात काय समजले, तुम्हाला कामात काय आवडले




नाही?' मग कर्मचारी म्हणतो, 'मला काम अजिबात आवडले नाही.' यानंतर खुशी चौरसिया नावाच्या 'एचआर'ने तिच्या लिंक्डइन अकाउंटवर ही संपूर्ण घटना शेअर केली आहे. त्यात तिने लिहिले आहे, कोणीही एका दिवसात परिपूर्ण होत नाही. यासोबतच तिच्या पोस्टमध्ये तिने नोकरीत सामील होणाऱ्या लोकांसाठी विशेष सल्लाही दिला आहे.



# चहाबाज घोडा

चहा म्हणजे अनेकांसाठी जीव की प्राण. गरमागरम वाफाळता चहा समोर आल्याशिवाय अनेकांच्या दिवसाची सुरुवात होत नाही. या जगात चहाबाज माणसांची कमतरता नाही. पण लंडनमधल्या मर्सीसाइड पोलिसांच्या ताफ्यातला एक घोडा कमलीचा चहाबाज आहे. या घोड्याला चहाचं व्यसनच जडलं आहे, असं म्हटल्यास वावगं ठरू नये. जॅक नावाचा हा घोडा २० वर्षांचा आहे. गेल्या पंधरा वर्षांपासून तो नियमितपणे चहा पितो. जॅकला सकाळी तबेल्यातच चहा लागतो. चहा प्यायल्याशिवाय त्याला तरतरी येत नाही. जॅकच्या दिवसाची सुरूवातही होत नाही. चहा प्यायल्याशिवाय तो कामाला जात नाही. जॅक पुढच्या वर्षी निवृत्त होणार आहे. पाच वर्षांचा असल्यापासून जॅक चहा पितो. मालकाच्या कपमधला उरलेला चहा चाटायची सवय त्याला लागली होती. मग या चहाने त्याला वेडंच करून टाकलं. ही सवय आता त्याच्या अंगात भिनली आहे. जॅक जीभ कपात बुडवून चहा पितो. मर्सीसाइड पोलीसही त्याला नियमित चहा देतात. जॅकचे सगळे लाड पुरवतात. जॅकचे चोचले अजिबात कमी नाहीत. त्याला गरम किंवा सायीचा चहा चालत नाही. पूर्ण दुधाचा एक चमचा साखर आणि थोडं थंड पाणी घातलेला चहा त्याला आवडतो. पण चहात जास्त साखर असेल तर तो खूप खूश होतो. चहा पिणाऱ्या जॅकचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्याच्या या व्हिडिओला दोन लाख रुपयांपेक्षा जास्त लाईक्स मिळाले आहेत.

# ...आणि तिचं स्वप्नं पूर्ण झालं

प्रत्येक माणसाचं काही ना काही स्वप्न असतं. कोणाला घर घ्यायचं असं तर कोणाला गाडी खरेदी करायची असते. कोणी जगभ्रमंतीची स्वप्नं रंगवत असतं. आता ही स्वप्नं पूर्ण करायची तर गाठीला पैसे हवेत. पैशांची जमवाजमव करण्यासाठी लोक बरीच मेहनत करतात. विविध मार्गांनी खर्चात कपात केली जाते आणि अखेरीस हे स्वप्न पूर्ण होतं. हे स्वप्न पूर्ण झाल्याचा आनंद वेगळाच असतो. अमेरिकेतल्या टेक्सासमध्ये रहाणारी एड्रिना एडवर्डस 'डेनीस' रेस्टॉरंटमध्ये वेटरचं काम करते. एड्रिनाला गाडी घ्यायची होती. गाडी घेता यावी म्हणून ती कार्यस्थळी चालत जात असे. एड्रिनाच्या कामाचं ठिकाण तिच्या घरापासून जवळ नव्हतं. एड्रिनाला तब्बल २२ किलोमीटर अंतर कापावं लागायचं. रेस्टॉरंटमधून घरीही ती पायीच यायची. एड्रिना जवळपास पाच तास चालायची. या रेस्ट्रॉरंटमध्ये आलेल्या एका जोडप्याला एड्रिनाबद्दल कळलं. त्यांनी एड्रिनाचं स्वप्न पूर्ण करायचं ठरवलं. हे जोडपं रात्री पुन्हा आलं. त्यावेळी त्यांच्या हातात नव्या कोऱ्या गाडीची चावी होती. त्यांनी ही गाडी एड्रिनाला दिली. गाडी बघून एड्रिना खूप खूश झाली. पाश्चात्य देशांमध्ये 'थँक्स गिव्हिंग'ची परंपरा आहे. यानिमित्ताने आपल्याला गाडी




देण्यात आल्याचं एड्रिनाला वाटलं. या गाडीचे पैसे द्यायचे असतील तर गरजवंतांची मदत कर, असंही या जोडप्याने एड्रिनाला सांगितलं. या नव्या गाडीमुळे एड्रिनाचे कष्ट कमी होणार आहेत.

# वीज आयोगाचे निर्णयांमुळे औद्योगिक क्षेत्रासह सर्वसामान्यांवर पडणार वीज दर वाढीचा बोजा

**विविध संघटनाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**



महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने वीज दर पुनरावलोकन आदेश त्वरित मागे घेण्यात यावा या मागणीसाठी ऑल इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशन सह आमी संघटना, व्यापारी असोसिएशन, उद्योजक यांनी निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना निवेदन दिले

नगर – महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिलेल्या वीज दर पुनरावलोकन आदेशामुळे मोठ्याप्रमाणात वीज दरवाढ होणार आहे. त्यामुळे राज्याच्या औद्योगिक, व्यावसायीक क्षेत्रावर १५ ते ३० टक्के वीज दरढीचा बोजा पडणार असल्याने भविष्यात सर्वसामान्यांनाही महागाईच्या मोठ्या धोक्याला सामोरे जाण्याची शक्यता आहे. याचा दूरगामी परिणाम लघु उद्योजक, विविध व्यवसायीकांवर होणार असल्याने हा आदेश तत्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी ऑल इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशन सह आमी संघटना, व्यापारी असोसिएशन, उद्योजक यांनी निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना निवेदनाद्वारे केली आहे, अशी माहिती ऑल इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनचे जिल्हा संचालक अमित काळे यांनी दिली.

अमित काळे म्हणाले, २५ जून रोजी जारी झालेला महाराष्ट्र वीज नियामक आयोगाचा पुनरावलोकन आदेशामुळे निर्माण झालेल्या गंभीर आणि दिशाभूल करणाऱ्या वीज दरवाढीचा निर्णय राज्यातील उद्योगधंद्यांना पंगू करणारा व ऊर्जा क्षेत्राला मारक ठरणारा आहे. या आदेशामुळे वीजदरात वाढ होणार आहे. याचा परिणाम उद्योग, हॉटेल, हॉस्पिटल, मॉल आदी क्षेत्रावर होणार असून सर्वसामान्यांना महागाईची झळ लागणार आहे. त्यामुळे राज्यातील उद्योग धंदे इतर राज्यांमध्ये जाण्याची खूप मोठी शक्यता असून बेरोजगारीतही वाढ होण्याची शक्यता आहे. ही दरवाढ कमी करावी अशी मागणी राज्यातील सर्व संघटना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार आहे, असे काळे यांनी सांगितले.

महाराष्ट्र इलेक्ट्रिक कॉंट्रॅक्टर असोसिएशनचे रज्याध्यक्ष उमेश रेखे म्हणाले, ही वीज दर वाढीचा अध्यादेश त्वरित मागे घेण्यासाठी पूर्ण राज्यात विविध संघटना, उद्योजक, व्यापारी आंदोलन करणार असून आपापल्या जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणार असून एक दिवस कामबंद ठेवणार आहेत. नवीन दररचनेमुळे सर्वसामान्य ग्राहकांच्या वीजबिलात दहा टक्के घट होणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, जुलै २०२५ पासून मिळणारी वीजबिले मार्च महिन्याच्या तुलनेत वाढलेली दिसणार आहेत. या दरवाढीचा आम्ही निषेध करत असल्याचे सांगत येथील आमदार संग्राम जगताप यांचीही लवकरच भेट घेऊन त्यांना निवेदन देणार असल्याचे सांगितले.

यावेळी दिगंबर हरीश्चंद्रे, भूषण बंग, ओम काळे, मनोहर शहाणे, अर्जुन ससे, व्यापारी असोसिएशनचे मंगेश निसळ आदींसह उद्योजक, व्यापारी उपस्थित होते.



नेप्ती येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी सुरेंद्र रावसाहेब होळकर तर व्हा. चेअरमनपदी सादिक नथू पवार याची बिनविरोध निवड करण्यात आल्याबद्दल सोसायटीच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# नेप्ती सोसायटीच्या चेअरमनपदी सुरेंद्र होळकर तर व्हाईस चेअरमनपदी सादिक पवार यांची निवड

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी सुरेंद्र रावसाहेब होळकर तर व्हा. चेअरमनपदी सादिक नथू पवार याची बिनविरोध निवड करण्यात आली असल्याची माहीती निवडणुक निर्णय अधिकारी मंदाकिनी ठोकळ, सचिव राजेंद्र खुंटाळे यानी दिली.

नेप्ती येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन, व्हा. चेअरमन पदाची निवड संस्थेच्या कार्यालयात सकाळी ११ वाजता पार पडली. चेअरमन, व्हा. चेअरमन पदासाठी एक एक अर्ज आल्याने हि निवड बिनाविरोध झाली. माजी सरपंच विठ्ठल जपकर यांच्या मार्गदर्शनाखाली हि निवड झाली. यावेळी माजी चेअरमन विलास जपकर, राजाराम जपकर, राजेंद्र जपकर, माच्छिंद्र होळकर, मुक्ता कांडेकर, अशोक जपकर, सुरेश कदम, जालींदर शिंदे, अंबादास जपकर, उमर सय्यद, राजू जपकर, मल्हारी कांडेकर, रोहीणी होळकर हे संचालक उपस्थित होते.

प्रत्येक वर्षी नवीन चेअरमन, व्हा. चेअरमनची निवड करण्याबाबत सर्व संचालकाचे एकमत झाल्यामुळे आज या नवीन संचालकाना संधी देण्यात आली.

यावेळी होळकर म्हणाले सेवा संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा सर्व योजनांचा लाभ मिळवून दिला जाईल. यावेळी सरपंच संजय अशोक जपकर, उपसरपंच एकनाथ जपकर, संजय आसाराम जपकर, सौरभ जपकर, वसंत पवार, संभाजी गडाख, दादू चौगुले, देवा होले, फारुक सय्यद, रामदास फुले, हर्षद तांबे, बहिरू जपकर, भूषण पवार,प्रसाद पवार, रवी होळकर, अविनाश होळकर, बाबा होळकर, बंडू जपकर, अतुल जपकर, भास्कर जपकर, अंबादास जपकर, अशोक होळकर, ज्ञानेश्वर जपकर, उत्तम फुले, अतुल गवारे, वंसत कदम व ग्रामस्थ उपस्थित होते.

# अहिल्यानगर महानगरपालिकेत अभियंते, विद्युत पर्यवेक्षक, इतर तांत्रिक ४५ पदांची भरती होणार

**टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसकडे प्रस्ताव सादर; कामकाजातील अडथळे दूर करण्यासाठी आवश्यक पदे भरणार : यशवंत डांगे**

नगर – महानगरपालिकेतील तांत्रिक पदांच्या भरतीचा प्रस्ताव टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसकडे पाठवण्यात आला आहे. महानगरपालिकेचा वाढत असलेला आस्थापना खर्च लक्षात घेऊन तांत्रिक दृष्ट्या आवश्यक असणारी अभियंते विद्युत पर्यवेक्षक अशी ४५ पदेच भरण्यात येणार आहेत. बिंदू नामवलीसह समांतर आरक्षण निश्चित करून पद भरती प्रक्रिया सुरू करण्यासाठी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसकडे प्रस्ताव पाठवला असून त्यांच्याशी करारनामाही केला आहे. कामकाजात येणारे तांत्रिक अडथळे दूर करण्यासाठी लवकरच ही भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

महानगरपालिकेचा कर्मचारी आकृतीबंध मंजूर झाल्यापासून आस्थापना खर्च मर्यादेपेक्षा अधिक असल्याने रिक्त पदे भरता आलेली नाहीत. त्यामुळे विविध अभियंते, विद्युत पर्यवेक्षक अशा तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होऊन कामकाजात अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे महानगरपालिकेने तांत्रिक पदांच्या भरतीसाठी आस्थापना खर्चाची अट शिथिल करून परवानगी द्यावी, असा प्रस्ताव नगर विकास खात्याकडे पाठवला होता. त्याला तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी देत १७६ पदे भरण्याचा प्रस्ताव मंजूर केला. दरम्यानच्या काळात सातवा वेतन आयोग लागू झाल्यामुळे महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चात पुन्हा एकदा वाढ झाली. त्यामुळे कामकाजातील अडथळा दूर करण्यासाठी अत्यावश्यक असलेली ४५ तांत्रिक पदे भरण्याचा निर्णय घेतला आहे.

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) – १५, कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) – ३, कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल) – १, अभियांत्रिकी सहाय्यक – ८, विद्युत पर्यवेक्षक – ३, लिपीक टंकलेखक – १३, संगणक प्रोग्रॅमर – १, पशुधन पर्यवेक्षक – १ अशी ४५ पदे भरण्यात येणार असून, पद भरतीची प्रक्रिया सुरू करण्यासाठी टाटा कन्सल्टन्सी या शासनाने नियुक्त केलेल्या संस्थेकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. त्यांच्याशी करारनामाही करण्यात आला आहे. लवकरच या पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू होणार असल्याचे यशवंत डांगे यांनी सांगितले.

# केडगाव येथील महावितरण कार्यालयात तोडफोड करत अधिकारी, कर्मचाऱ्यांना जमावाकडून शिवीगाळ व मारहाण

**माजी नगरसेवकासह १२ ते १५ जणांवर गुन्हा दाखल**

नगर – वीज पुरवठा खंडित झाला म्हणून महावितरण कंपनीच्या केडगाव येथील कार्यालयात घुसून जमावाने तेथील खुर्च्या, रजिस्टर व इतर साहित्याची तोडफोड करत तेथे असलेले अधिकारी व कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना ८ जुलै रोजी रात्री ९.२० वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी शिवसेनेचे माजी नगरसेवक अमोल येवले यांच्यासह १२ ते १५ जणांवर कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत महावितरणचे शहर विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुनिल रघुनाथ राहिंज (वय ४५, रा. सिध्दीविनायक कॉम्पलेक्स, बुरुडगाव रोड, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीत म्हटले आहे की, ८ जुलै रोजी दुपारी ४.२० च्या सुमारास रभाजी नगर, लिंकरोड, भुषणनगर, शाहुनगर, मराठा नगर, कांदा मार्केट रोड, कल्याण रोड येथे केडगाव उपकेंद्रातून जाणारी वीज वाहिनी नादुरुस्त झाल्याने तिच्या दुरुस्ती साठी केडगाव येथील १३२ के.व्ही. उपकेंद्र येथून विज पुरवठा खंडीत करण्यात आला होता. त्यानंतर रात्री ९ वाजण्याच्या सुमारास आपण केडगाव उप केंद्र येथील ऑफीस मध्ये गेलो असता तेथे राहुल सिताराम शिलावंत, सुग्रीव नामदेव मुंढे, गोरक्षनाथ रोहकले हे कर्मचारी उपस्थीत होते.

त्यानंतर रात्री ९.२० वाजता दुरुस्तीचे काम झाल्याने विज वाहिनीचा विज पुरवठा सुरु करण्यात आला. त्यावेळी लगेच तेथे माजी नगरसेवक अमोल येवले सह १२ ते १५ लोक आले.त्यावेळी अमोल येवले हे मला म्हणाले की, तुम्ही काय काम करता, नुसते मोबाईल खेळता, किती वेळ झाला लाईट नाही. असे म्हणाले असता मी त्यांना म्हणालो की, केडगाव भागामध्ये दुरुस्तीचे काम चालु होते व ते काम करत असताना लाईट बंद करावी लागते असे म्हणालो असता अमोल येवले व त्यांचे इतर सहकारी यांना राग आल्याने ते मला शिवीगाळ करु लागले.

त्यावेळी मी त्यांची समजुत काढत असताना अमोल येवले यांचे सोबत असलेले इतर १२ ते १५ अनोळखी इसम हे ऑफीस मधील खुर्च्या, रजिस्टर फेकु लागले. त्या गोंधळामध्ये कोणीतरी अज्ञात इसमाने मला पाठीमागुन काही तरी टणक वस्तुने माझ्या डोक्यात मारले. त्यावेळी मला सोडवण्याकरीता माझे सहकारी राहुल शिलावंत हे आले असता त्यांना देखील त्या अनोळखी इसमांनी शिवीगाळ करून लाथा बुक्यांनी मारहाण केली आहे. तसेच तुम्ही येथे कश्या प्रकारे नोकरी करता, ते बघुन घेतो अशी धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी माजी नगरसेवक अमोल येवले यांच्या सह १२ ते १५ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

## चार्टर्ड अकाउंटंट परीक्षेत विशाखा वारे हिचे यश

नगर – चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेत अहमदनगरच्या विशाखा राजीव वारे हिने यश संपादन केले आहे. मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या विशाखाने १२ वीमध्ये ९४% गुण मिळवत आपली शैक्षणिक गुणवत्ता लवकरच सिद्ध केली होती. तिच्या अभ्यास आणि समर्पणाला प्रत्येक टप्प्यावर तिच्या आई–वडिलांसह संपूर्ण कुटुंबाची खंबीर साथ लाभली.



विशाखाच्या यशामागे तिच्या आर्टिकलशिपच्या काळात प्रिन्सिपल सीए महेश तिवारी यांचे म ार्गदर्शन आणि प्रेरणादायक सहकार्य मोलाचे ठरले. अभ्यासादरम्यान सीए संदीप देसरडा, सीए प्रसाद भंडारी आणि वृशाली गांधी यांचंही तिला मार्गदर्शन लाभले.

## मनाली भंडारी सीए फायनल परीक्षा उत्तीर्ण

नगर – मनाली भंडारी सीए फायनल परीक्षा उत्तीर्ण झाल्या असून त्यांना यासाठी सीए अभय भंडारी, प्रसाद भंडारी, संदीप देसर्डा यांचे मार्गदर्शन लाभले.



जुन्या काळातील प्रसिद्ध अकौंटंट कै. मोतीलाल (बाबुशेठ) भंडारी यांचे ती नात तसेच भंडारी हार्डवेअरचे संचालक धनेश भंडारी यांची कन्या आहे.

## प्रणव सोहोनी सीए फायनल उत्तीर्ण

नगर – इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडिया तर्फे मे महिन्यामध्ये घेण्यात आलेल्या सनदी लेखापाल (सी.ए.) अंतिम परीक्षेमध्ये सावेडी येथील प्रणव आनंद सोहोनी उत्तीर्ण झाले. ते ५० टक्के जास्त विकलांग असून सुद्धा त्यांनी हे यश मिळविले आहे.



त्याच्या या यशामध्ये त्यांचे वडील आणि संपूर्ण सोहनी कुटुंब चार्टर्ड अकाउंटंट राजेंद्र जोशी व सौ. हर्षदा कुलकर्णी आणि मित्रमंडळी यांचे प्रोत्साहन आणि विशेष सहकार्य मिळाले हे यश त्यांची दिवंगत. आई शुभांगी यांना त्याने समर्पित केले आहे.

## सीए फायनल परीक्षेत सौरभ कर्नावट यांचे यश

नगर – इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंट ऑफ इंडियातर्फे मे २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या सनदी लेखापाल (सी.ए.) अंतिम परीक्षेत छत्रपती संभाजीनगर येथील सौरभ राजेंद्र कर्नावट उत्तीर्ण झाला. त्याला सी.ए. पवनकुमार दरक (एफ.सी.ए. ॲकडमी) यांचे मार्गदर्शन लाभले. सौरभने पवनकुमार दरक ॲण्ड असोसिएट येथे आर्टिकलशिप पूर्ण केली आहे. त्याच सोबत सी ए आनंद लोढा यांचेही मार्गदर्शन लाभले.



मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अपघातग्रस्त ट्रकमधील साहित्य चोरणारी ६ जणांची टोळी पकडली



वांबोरी घाटात अपघातग्रस्त मालट्रकमधून साहित्य चोरणारी टोळी पकडल्यानंतर त्यांच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

नगर – अपघातग्रस्त ट्रकवर डल्ला टाकून त्यामधील टायर व साहित्य (तांबे) चोरी करणाऱ्या वांबोरी (ता. राहुरी) येथील टोळीचा एमआयडीसी पोलिसांनी छडा लावत पर्दाफाश केला आहे. या कारवाईत तब्बल ३ लाख ६० हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, सहा जणांच्या टोळीला अटक करण्यात आली आहे. पोलिसांच्या या कारवाईची वांबोरी परिसरात जोरदार चर्चा सुरू आहे.

ओंकार ज्ञानदेव पवार (वय २५), शुभम जनार्धन जाधव (वय २१), मयुरेश शाम मोरे (वय २२), सचिन महादेव शेळके (वय २५), फिरोज अनिस शेख (वय ३१), दीपक सुभाष शिंदे (वय ३२, सर्व रा. वांबोरी, ता. राहुरी) अशी अटक केलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. तामिळनाडू येथील मुर्ती रामस्वामी सेलप्पाकांऊडर (वय ५१) यांनी याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात ८ जुलै रोजी फिर्याद दिली आहे. ट्रक (क्र.टीएन ५२ एच ४४४३) चेन्नई येथील जैन रिसोर्स रिसायलींग लिमिटेड या कंपनीमधून माल घेऊन अहमदाबाद (गुजरात) येथील मारूती रिसायलींग कंपनीकडे जात असताना, ट्रकचा वांबोरी घाट, डोंगरगण शिवारात अपघात होऊन तो दरीत कोसळला होता. अपघातात ट्रक चालक व सुरक्षा रक्षक जखमी झाले, तर ट्रकमधील काही साहित्य रस्त्यावर पडले होते. याच संधीचा फायदा घेत काही अज्ञात चोरट्यांनी सहा टायर व इतर साहित्य लंपास केले होते.

दरम्यान, या चोरीप्रकरणाचा तपास करत असताना सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांना मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी तातडीने कारवाई करत वांबोरी (ता. राहुरी) येथील सहा संशयित आरोपींना ताब्यात घेतले. या सर्व संशयित आरोपींनी तपासात गुन्ह्याची कबुली दिली असून, त्यांच्याकडून ट्रकचे सहा टायर व इतर साहित्य असा एकूण ३ लाख ६० हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक माणिक चौधरी, उपनिरीक्षक मनोज मोंढे, अंमलदार मोहम्मद शेख, अनिल आव्हाड, आदिनाथ पालवे, सुशांत दिवटे, विष्णु भागवत, जयसिंग शिंदे, ज्ञानेश्वर तांदळे, सुरज देशमुख यांच्या पथकाने केली आहे.

# कोचिंग क्लासमधील शिक्षकांकडून विद्यार्थिनीचा विनयभंग

**केडगावातील घटना, विनयभंगासह पोक्सोचा गुन्हा दाखल**

नगर – गुरुपौर्णिमा जवळ आलेली असतानाच गुरु – शिष्याच्या नात्याला कलंक लावणारी घटना केडगाव मध्ये घडली आहे. एका खाजगी कोचिंग क्लासमधील शिक्षकाने इयत्ता १० वी मध्ये शिकणाऱ्या १५ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करत तिला लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य करुन तिचा विनयभंग केल्याची घटना ७ जुलै रोजी केडगाव उपनगरातील कोचिंग क्लासमध्ये घडली.

याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात पीडित मुलीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की पीडित मुलगी ही एक वर्षापासून केडगाव येथील कोचिंग क्लास येथे जात आहे. क्लासमधील शिक्षकाने पीडित मुलीच्या वाढदिवसानिमित्त क्लासमधील मुलामुलींना घेऊन पार्टी ठेवली होती. पीडित मुलगी त्या पार्टीला गेली असता त्या शिक्षकाने पार्टी दिल्यानंतर पीडित मुलीस बाजूला घेऊन, तू मला खूप आवडतेस. तू माझी पहिली गर्लफ्रेंड सारखी दिसतेस. मी तुझी काही हॅरेशमेंट करणार नाही. मी टपोरी नाही, असे सांगितले. त्यावेळी त्या मुलीने त्यांना 'मी लहान आहे, माझे आई, वडील मला रागावतील' असे म्हणून नकार दिला.

हा प्रकार मुलीने घाबरुन घरी सांगितला नाही. त्यानंतर ७ जुलै रोजी सायंकाळी क्लास सुटल्यानंतर पीडित मुलगी घरी जाण्यासाठी बॅग भरीत असताना त्या शिक्षकाने तिला आवाज देऊन बोलावले व त्याच्याकडे ओढून तिला मिठी मारली. त्याचवेळेस पीडित मुलीची आई, मुलीस घरी नेण्याकरिता तिथे आली असता तिने त्यांच्या तावडीतून मुलीस सोडवले व हा प्रकार मुलीच्या वडिलांना फोनवरुन कळविला. मुलीचे वडील पुण्याहून घरी आल्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार देण्याकरिता धाव घेतली.

याप्रकरणी पीडित मुलीने दिलेल्या फिर्यादीवरुन त्या शिक्षकाविरुद्ध बीएनएस कलम ७४, ७५, ७८, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ८, १२ प्रमाणे गुन्हा दाखल केला. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सपकाळे हे करीत आहेत.



बुरुडगाव रोडवरील जुगार अड्ड्यावर छापा टाकून जुगार खेळणाऱ्यांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

# बुरुडगाव रोडवरील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**१५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल, ३० लाखांचा मुद्देमाल जप्त**

नगर – बुरूडगाव रोडवरील नक्षत्र लॉनजवळील एका खोलीत सुरु असलेल्या 'तिरट' नावाच्या जुगार अड्ड्यावर कोतवाली पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत १५ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्या कडून ३० लाख ५० हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना बुरूडगाव रोडवरील नक्षत्र लॉनजवळील एका खोलीत जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती मिळाली होती. त्या नुसार त्यांनी कारवाईसाठी पथक पाठविले. या पथकाने तेथे जावून छापा टाकत जुगार खेळणाऱ्या १५ जणांना ताब्यात घेतले. त्यांच्या कडून तिरट जुगाराचे साहित्य, रोख रक्कम, १५ मोबाईल फोन ३ चारचाकी वाहने, ३ दुचाकी असा एकुण ३० लाख ५० हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड करीत आहेत.

ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या सुचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, पोलीस अंमलदार बाळकृष्ण दौंड, विशाल दळवी, सलीम शेख, विनोद बोरगे, विक्रम वाघमारे, सुर्यकांत डाके, सत्यजीत शिंदे, अमोल गाडे, अतुल काजळे, सोमनाथ केकाण, महेश पवार, शिरीष तरटे, सचिन लोळगे, दत्तात्रय कोतकर, प्रतिभा नागरे यांनी केली.

# अरणगाव शिवारातील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; १२ जणांविरुध्द गुन्हा दाखल, ७.५३ लाखांचा मुद्देमाल जप्त

नगर – नगर दौंड रोडवर अरणगाव (ता.नगर) शिवारात हॉटेल सारंगीचाब पाठीमागे असलेल्या देशमुख पोल्ट्री फार्मच्या पत्राच्या शेडमध्ये सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिस अधिक्षकांचे विशेष पथक व नगर तालुका पोलिसांच्या पथकाने संयुक्तपणे छापा टाकत ८ जणांना ताब्यात घेतले तर ४ जण अंधाराचा फायदा घेवून पसार झाले. ताब्यात घेतलेल्या इसमांकडून ७ लाख ५३ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याबाबतची माहिती अशी की पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे विशेष पथक नगर तालुका पोलीस ठाण्याच्या गस्त करीत असताना मिळालेल्या माहितीवरुन पथकाने नगर दौंड रोडवर अरणगाव शिवारातील हॉटेल सारंगीच्या पाठीमागे देशमुख पोल्ट्री फार्मच्या शेडमध्ये सुरु असलेल्या तिरट नावाचा हार जितीचा जुगार अड्डुयावर छापा टाकला.त्यावेळी पोलीस पथकाची चाहुल लागताच त्या ठिकाणी असलेले इसम पळुन जाऊ लागले. त्यांना पोलीस पथकाने पाठलाग करुन ताब्यात घेतले असता ८ इसम मिळून आले व ४ इसम अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले.

ताब्यात घेतलेल्या इसमांकडून पोलिसांनी ९५ हजार ४०० रुपये रोकड व ६८ हजार रुपये किंमतीचे ६ मोबाईल फोन तसेच ५ लाख ९० हजार रुपये किंमतीचे लहान मोठे ४ वाहने असा एकूण ७ लाख ५३ हजार ४०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

विशेष पथकाचे प्रमुख प्रशिक्षणार्थी पोलिस उपअधीक्षक संतोष खाडे, नगर तालुका पोलिस ठाण्याचे स.पो.नि. प्रल्हाद गिते यांच्या पथकाने ही कारवाई केली.

